नाटक १०५ स. १८९२

ले. विष्णु भिकाजी कापरेकर.

सं. कचदेवयानी

( श्री प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स ठाणे )

नाटक

लेखक

विष्णु शिवाजी कापरेकर

सन १८८२

किंमत ४ आणे

श्रीशंकर.

# संगीत कचदेवयानी नाटक

मंगलाचरण.

पद—नमन ईश चरणा—या चालीवर.

सकल विश्वपाला ॥ शरण तुज तुझ्या पदाचा किंकर आला ॥धृ
स्मरण तुझें करितां काय नराला करील मग ती भवचिंता ॥
राक्षस सुरमुनी यांसि पार न लागे तुझ्या गुणांचा शंखचक्रधरा
महाबला ॥ सक० ॥ १ ॥

पद—साध्य नसे मुनिकन्या याचा०

प्रथम वया प्रभुला ॥ करितसें नमन सुभावें गौरिसुताला ॥धृ० ॥
कार्यारंभीं स्तवितां ज्यातें ॥ प्रेमल भावें मंगल होतें ॥
करिही सखया ऐसे ॥ साधुनि देती आत्महिताला ॥ १ ॥
दूर्वांकुर शिरीं फार शोभती ॥ कंठिं वशा सुपमाला विलसति ॥
विघ्नं निवटुनि होतो ॥ स्मरणें कारण मंगल कविला ॥ २ ॥

सूत्र०— साकी.

सुरासुरांनीं सागर मंथन करुनी. जीं मेळविलीं ॥
रत्नें त्यांतुनि उग्र विषाची प्रीती ज्यानें धरिलीं ॥
देवो सकल्ा [illegible] ॥ [illegible] स्मरणें वळतो ॥१॥

सू०— नमन तर आटपलं, आतां या जमलेल्या समाजनांचा सत्कार कसा करावा ! ( अंमळ विचार करून ) अथवा यावेळीं मला काय कमी आहे ? ( पडद्याकडे हात करून ) या ऋतुंत जिकडे तिकडे पहा किती मौज आहे ती ! सुगंधयुक्त पुष्पं आणि मधुर फलं यांनीं हे वृक्ष कसे लवून गेले आहेत; तसेंच जिकडे तिकडे कोकिला म

शब्द करीत आहेत आणि गंधयुक्त मंद वायुही सुटला आहे, यावरून हा ऋतु स्वभावतःच एखाद्याचं आदरातिथ्य करीत आहे असं दिसतं. शिवाय यावेळीं लोकस्थिति सुद्धां ऋतुमानाला अनुसरूनच झाली आहे. पहाना !

सवाई—शिवउदकीं अंघोळ याचा०

गृहांतरीं सुख न होत । ह्मणुनि लोक वनीं जात ॥
सीतजलें पान करित । मंदवायु भक्षिती ॥ १ ॥
गंधयुक्त पवन येइ । मोद जनां बहुत देइ ॥
रम्य वनशोभा पाहि । दे वसंत या जनीं ॥ २ ॥

( कांहीं स्मरल्यासारखें करून ) मीं प्रियेला इकडे लवकर ये, असें सांगितलें असून, अद्यापि सुद्धां तिचा ठिकाण नसावाना ! धिःकार असो ! अलीकडे पतिआज्ञाभंग करणं हाच स्त्रियांचा मुख्य धर्म झाला आहे हें खरं !

( इतक्यांत नटी घाईनें प्रवेश करून )

पद—व्यर्थ आह्मी अबला या चा०

क्षणभरि धीर धरा ॥ प्रियकरा ॥ क्षणभरि० ॥ धृ० ॥
कोपभरें मज दूषण देतां ॥ पतिसेवातत्पर मी कांता ॥
अनुभव ऐसा अजवरि येतां ॥ कोप असा न बरा । मजवरी॥१॥

सूत्र०—( त्रासानें ) तर मग एवढा वेळ तूं होतीस कुठें ?

नटी०— अंमळ शांत व्हाल तर सारं सांगतें. मी माझ्या मैत्रिणीकडे कांहीं कार्या करितां गेलें होतें.

सूत्र०— शाबास ! अशा घाईच्या वेळीं तुझं कोणचं कार्य अडलं होतं ?

नटी०— आपल्याच कन्येच्या लग्नाचं ज्याला कन्यादान करावयाचं, तो मुलगा तिच्याकडे आला आहे, तो मी जाऊन पाहिला.

सूत्र०— धन्य आहे ! तुह्मी स्त्रिया या लग्नकार्यांत मोठ्या दक्ष

खऱ्या ! मूर्खे !

साकी.

[illegible] हे विद्वज्जन पूं वर जो निजकन्येला ॥
पाहियला त्या दुहिता देतां निष्फलदचि ती त्याला ॥
होइल हा तुजला ॥ शाप असो या समयाला ॥ १ ॥

नटी— हें काय बाई रागाच्या भरांत आपलंच आपण अनहित केलं. त्याच मुलाला आपण कन्यादान करण्याचं खास सुद्धां ठरविलं होतं !

सूत्र०— अरे ! तर हें अंमळ गौणच झालं ! असो आतां तुमच्या एखाद्या योग्य वराला कन्या देऊन कार्यभाग उरकून घेऊं. बरं पण प्रिये, तो विषय राहूं दे. या समाजनांच्या सत्काराची तयारी कशी करावी तें सांग.

नटी— ( आनंदानें ) तः यांचं आदरातिथ्य करण्याला घरांत काय कमी आहे ? पंचपक्वान्नं सिद्ध आहेत !

सूत्र०— ( हंसून ) प्रिये—

साकी.

घृत मधु पायस मिष्टान्नांच्या लोभें नच हे आले ॥
श्रृंगारादी नवरस सेवायातें असति भुकेले ॥
नवनाटक रचना ॥ देइल तोष सखे यांना ॥ १ ॥

तर नाटक कोणचं करावं हें सांग.

नटी— हें काय बाई !—

शुद्ध कामदा छंद.

चतुर नाटकी खेळ बहुपरी ॥ करितसे हरी नित्य भूवरी ॥
मग कथासि ती न्यूनता कशी ॥ गमत आपणा आज फारसी ॥१॥

सू०—( स्मरणपूर्वक ) हो तुझ्या या बोलण्यानं मला बरी आठवण झाली ! पर्वां आपल्या मित्रानं आपणाला जें " कचदेवयानी " नांवाचं नाटकार्थ दिलं आहे, तोच प्रयोग आज आपण करून दाखवूं. पात्रं आपणांजवळ जीं आहेत त्यांनाही तो सुलभ असून प्रयोग लहान

आणि मौजेचा आहे! तर आतां विलंब नको. एकाच विषयाकडे तूं माझं मन गुंतविल्यामुळं मला मजजवळ असलेल्या वस्तूंचं अगदीं विस्मरण झालं होतं जसं.

साकी.

शुक्रापासुनि संजीवनि साधाया कच हा आला ॥
परि राक्षस खल एथ वसति हें भान नसे लव त्याला ॥
चिंतित मन ज्याचें ॥ मान ... शा नि तनुचें ॥ १ ॥

म्हणून चल आपण जाऊं. ( हीं म... आजी नटी सूत्रधार जातात. )

( वदनेवर प्रवास वेषानें कच येतो. )

कच—काय, मला उद्देशून इथें कोणी बोलत होताना? ( इकडे तिकडे पाहून ) पण इथें तर कोणी नाहीं, एकूण कोणचीही गोष्ट मनांत येतांच जनांत होते असं म्हणतात तें खोटं नाहीं! पण तो गृहस्थ मला भेटता तर बरं होतं; म्हणजे माझा गुप्त बेत एवढ्यांत प्रसिद्ध कसा झाला याचा शोध मी केला असता! याच्या भाषणा वरून पुढील स्थितीचं चित्र माझ्या डोळ्या ... होतं. पूर्वापार देवदैत्यांचा वैरसंबंध! मी देवगुरूचा पुत्र! तेव्हां अर्थात् यो राक्षसांचा वैरी असून या राक्षसभुवनांत वास करणारी एखादी अमूल्य विद्या प्राप्त करून घेऊन असुरांचा तेजोभंग करावा या हेतूनं मी इथें आलों आहें. तेव्हां माझं कर्तव्य किती तरी कठीण आहे! असु‍र गुरू त्रिकालज्ञ आहेत. ते तरी माझा कपटहेतु तेव्हांच जाणतील! मग ते मला आश्रमांत शिष्यत्वानं तरी कसा ठेऊन घेतील! बरं कदाचित्त त्यांनां दया येऊन त्यांनीं मजवर अनुग्रह केला, तरी राक्षस मला सुखाचा लेश सुद्धां मिळूं देणार नाहींत हें मात्र निःसंशय समजलं पाहिजे. एकूण या पुढें—

पद—( नाहीं झाले षण्मास मला ) या चा०

लभ्य नाहीं सुख लेश मला खचित या स्थळीं ॥

खरी कुदशा ही प्राप्त एथ मला जाहली ॥ धृ ॥
एथ असुर दुष्ट वसति सकल भयद फारसे ॥
ब्राह्मणसुत त्यां माजी एक मी असें ॥
एकलिया हंसातें काक बहु कमे ॥
देतिल सुख तरुतलीं ॥ १ ॥

आ ७०३

—( अंमळ विचार करून ) अथवा ही काळजी मला नको. कारण ज्यांच्या हितासाठीं मी हें साहस आचरीत आहें, त्या देवांनीं आणि त्रिकालज्ञ जो माझा पिता त्यांनीं या गोष्टी मनांत आणूनच मला इकडे पाठविला आहे.—

दिंडी.

त्रिकालज्ञचि मम तात शुद्ध माचा ॥ भार त्यावरि माझिया रक्षणाचा॥
मीन टाकिती जलीं बालकाला ॥ कोण रक्षक होतसे तेथ त्याला॥१॥

( कांहीं चालून इकडे तिकडे पाहून. )

—अहाहा ! हें स्थल मला फारच आनंद देतें ! यावरून हें खचित कोणा तरी साधु पुरुषाचें असावें असें वाटतें. ( पुन्हां इकडे तिकडे पाहून ) अथवा संशय नकोच ! कारण—

अंजनी गीत.

पुष्पफलांनीं जरि हे भरले ॥ तरुवर बहु परि लीनचि झाले ॥
सत्संगानें जणु हे शिकले ॥ या सुविचाराला ॥ १ ॥
पशुपक्षिहि [illegible] वागती ॥ वर्मनयाची धरुनी भीती ॥
पुण्यस्थलाविण उपान्न [illegible]ती ॥ व्याघ्र एथें कैंची ॥ २

( कांहीं चालून पडद्याकडे पाहून )

[illegible] या [illegible] वृत्तान्ताचा समाचार घेत घे
[illegible] इकडे येत [illegible] ! अथवा
असु [illegible] [illegible]हणी [illegible] ! (
छे ! छे ! [illegible] पाउलयांनी निराळी दिसते. मग काय असेल तें असो !

पद—ब्राह्मण कन्या नव्हे खरी ही—या चा०

हळु हळु तरुणी पाऊल टाकी नम्र किती ही दिसे ॥
दयेची मूर्ति जणू ही वसे ॥शुष्कपर्ण ही शाखा [illegible]
हळु हळु पाडी कसें ॥ नखाग्रें परि [illegible] ॥
नवदल पतनें हरिणाक्षीच्या अश्रु नयनिं येतसे ॥
बघुनि मज रत्नभ्रम होतसे ॥ १ ॥

—अथवा स्वभावतःच स्त्रीजातीला वृक्षपल्लवांची प्रीती फार असते, म्हणूनच ही असं करीत असेल.

( इतक्यांत पडल्यांत. )

देव०—"सखे, वारा आल्यानं या वृक्षाचीं किती तरी फुलं माझ्या आंगावर पडलीं हीं !"

—काय प्रमाद हा ! अरे सुमनवृक्षा, तूं आपल्या पुष्पसुगंधानं लोकांवर उपकार करणारा असून, यावेळीं किती निर्दयपणाचं [illegible]र्तन केलंस !

पद— तनूची सुंदरा या चा०

निज बंधूसम खरी ॥ प्रीति तुजवरी ॥ करिते को(?)ळलांगि
सुंदरी ॥ करिसि ही निष्ठुरता तिजवरी ॥ पल्लवाचि हिंस
जरी ॥ हेंस बहु तरी ॥ स्पर्श ही पल्लवासि नच करी ॥
आणुनि कींव तुझी अंतरीं ॥ तिजवरी अदया कसी ॥
सुमनें हीं अपुलीं वर्षसी मृगिवरी शरवृष्टी जशी ॥ १ ॥

कच— अथवा हा दोष या वृक्षाचा नसेल ! बहुधा असंच घडलं असावं.

दिंडी.

कामिनीसह मत्कृत्य पहायाला ॥ स्वर्गि उत्सुक सुरसंघ फार झाला ॥
रूप सुंदरि या स्थळीं ही बघोनी ॥ पुष्प वृष्टी वाटते केलि त्यांनीं ॥ १

कच०— काय हा चमत्कार आहे !

पद— शेवाळें युक्त जैसे या चा०

धरुनी जो हेतु येथें मी आजी पातलों ॥

पाहुनिया सुंदरींना परि तो मी विसरलों ॥
…णानियां चित्तिं कांहीं सुख मानूं लागलों ॥
…मी मृगजलानें भ्रांत जसा जाहलों ॥ १ ॥
( … त वर्णन केल्या प्रमाणें शर्मिष्ठा आणि देवयानी
…तात–कच त्यांच्या दृष्टीआड होतो. )

शर्मि०– सखे, तूं हीं पिकलेलीं पानंच वेंचीत आहेस हें काय ! अहाहा ! …लीं नवीं कोमल पानं आणि फुलं काय थोडीं आहेत ! तुह्मां ब्राह्मणाच्या मुलींना खऱ्या सौंदर्याची पारखच नाहीं, असं जर आतां ह्मटलं तर तुला राग मात्र येईल !

देव०– असं काय ! बाई दुसऱ्याचं सौंदर्य नाहींसं करून आपलं शरीर शोभविण्यांत तुमच्या सारखी आह्मांला हौस वाटत नाहीं. असं ह्मटल्यानं तुला मात्र राग येऊं देऊं नको !

कच०– शाबास ! याचं नांव चातुर्य ! एकूण ही ब्राह्मण कन्या आहे. हा तर माझ्या कार्याला शुभ शकुनच आहे असं वाटतं ! हीच जर त्या महामुनीची कन्या असेल, तर तृषिताला जलाचा शोध करीत असतां जसे जलानं भरून आणीत असलेले घट दिसावे तसाच लाभ मलाही झाला असं मी समजेन ! पण ही अशी निर्मल ब्राह्मणकन्या या कठोर आणि गर्विष्ट असुरकन्यांच्या समाजांत आहे, एवढंच वाईट वाटतं. ( अंमळ थांबून विचारपूर्वक ) अथवा ह्या स्थितींत असल्यामुळंच हिचा थोरपणा मला विशेष वाटतो.

पद– लोपविली बहुत शोभा या चा०

तेज बहु अंधकारीं दीपाचें शोभतें ॥ पंकीं ती पद्म कांती
रमणीया वाटते ॥ पलशाच्या सुमन भागीं जाईचें
सुमनतें ॥ असतांना मधुर भारी दृष्टीला दीसतें ॥ १ ॥

शर्मि०–सखे, तूं असी हळूहळू चालूं लागलीस, तर या साऱ्या बागेंत फिरण्याला दुपार नाहीं का होणार ! तूं बाई आतांशें भारीच मंद झाली आहेस.

देव०– बरं गडे दुसऱ्याला खोंचून तुला चांगलं बोलतां येतं–

( उभयता अंमळ लक्षकर चालवात. )

कच०— हिच्या जडपणाचं कारण कांहीं निराळेंच असावं असे तर नसेल!

छंद—शुद्ध कामदा

तनु सुरम्य ही योग्य पाहुनी ॥ रतिपती स्वयें तींत येउनी ॥
प्रकट जाहला भार होतसे ॥ म्हणुनि कामिनी मंद ही दिसे ॥ १ ॥

अथवा संशय नकोच. हिच्या चालचर्येवरून असंच दिसतं कीं—

पद— लाजवील ही सुर युवतीस या चा०

अनंग छाया हिजवरि पडली ॥ काम विचारीं वृत्ती जडली ॥ ध्रु० ॥
स्थैर्य मानसीं लवहि नसे तें ॥ क्षणक्षणी किती गोष्टि चिंतितें ॥
क्षणीं मुदित क्षणीं खिन्न भासते ॥ क्षणीं हांसे ही सुमंद गालीं ॥ १ ॥

देव०— या आम्रवृक्षाकडे पाहिलंस! हा या वेळीं कोंवळ्या मोहरानं अगदीं गच्च भरला आहे. यावरून हा हास्य करितो असं वाटतं.

कच०— खचित अशा स्त्री रत्नाला पाहिल्यावर कोणाला आनंद होणार नाहीं! या संपूर्ण उपवनाचं सुद्धां हास्य मुख झालं आहे. याला तरी कारण दुसरं काय असणार! एकूण ब्रह्मदेवानं तरी या ठिकाणीं आपल्या कल्पनेची आणि अ[illegible] कमाल केली खरी! कारण—

दिंडी

दृष्टि पडलें नच आजवरी ऐसें ॥ चित्रकाराला काढवेल कैसें ॥
चित्र केल्याविण दीर्घ कल्पनेला ॥ वेंकिल्याविण आपुल्या [illegible]
[illegible] ॥ १ ॥

शर्मि०— या वृक्षानं हास्य केलं, याचं कारण [illegible], तसंच कांहीं असेल!

देव०— तें ग कोणचं—

शर्मि०— हें पहा. या ऋतूंत तुझ्या सारख्या मुलीनं एकटं बागेंत येणं हें का लहान आश्चर्य आहे!

कच०— तर मग हा दोष खचित हिच्या पित्याचाच आहे !

पद—दैवयोग दुर्विपाक या चा०

भासे मज जनक तुझा खचित सुंदरी ॥ अविवेकी नेणें तव दुःख अंतरीं॥
कोमळ नव गंधयुक्त वृक्षिं उमटली॥ रसभरिता सुमनकळी नाहीं चाखिली
जरि मधुरें तरि उमटुनी व्यर्थ जाइली ॥ मधु जातां नच येवी भ्रमर
विजवरी ॥ १ ॥

देव०— बाई दिव्याच्या खालचा अंधकार मात्र दिव्याला दिसत नसतो !

कच— अरे मी असा भ्रांत होऊन यांच्या विनोदांत मौज मारीत काय बसलों ! मला माझ्या कार्याकडे दृष्टि दिली पाहिजे.

शर्मिष्ठा— सखे माझ्या बोलण्यानं तुला कांहीं वाईट वाटूं देऊं नको ! पहा चक्रवाक आणि चक्रवाकी जरी एकमेकां पासून दूर झालीं तरी योग्य काळीं त्यांची भेट होतेच !

कच—या स्त्रीच्या चेष्टा किती चमत्कारिक आहेत !

पद—किती मधुर रूप तरि यांचें या चा०

सखि कथिते हितगोष्टीला ॥ परि झिडकारी ही तिजला ॥
प्रिय वच जे गमवि मनाला ॥ ते कटुसे दावि सखीला ॥
विनयें करि नच हास्याला ॥ दावितसे वरि कोपाला ॥
लटिका जरि ही कोप सखीवरि ॥ करिते वरि या वदनेंदूला ॥
रक्तवर्ण आला ॥ १ ॥

—आतां मात्र वेळ घालवूं नये. ( पुढें होऊन ) बाई शुक्रमहामुनींचा आश्रम कोठेंसा आहे बरं ?

( शर्मिष्ठा आणि देवयानी साश्चर्य होतात. )

शर्मिष्ठा—म्हणजे ! आपण असे सुकुमार असून या राक्षसभुवनांत पायानंच कोठून आलां ?

कच—बाई अशा भिऊं नका. अंमळ स्वस्थ होऊन सर्व सांगतों. पण तों पर्यंत तुमचं चरित्र कळेल, तर मला मोठा लाभ झालासं मी

समजेन.

देव०—अगबाई यांत लाभ कसला ! पण महाराज, आपण श्रमलेले दिसतां यामुळं हें उपवन सुद्धां श्रम पावतं; ह्मणून क्षणभर विश्रांति तरी घ्यावी.

कच—बाई ! मनांतील उत्कंठा पूर्ण झाल्याशिवाय विश्रांति घेतां नये. ह्मणून थोडक्यांत तुमची हकीकत सांगून मला इष्ट मार्ग दाखवा ह्मणजे माझे श्रम खचित हरतील !

देव०—( आपल्याशीं ) हें तरी खरंच आहे ! मेली मनाला हुरहुर असली तर वर उपचारानं सुख कसं होईल !

शर्मि०—( आपल्याशीं ) माझ्या सखीनं जणूं यांच्या अंतरंगांतच प्रवेश करून तें ओळखिलं असं दिसतं ! ( कचाला ) महाराज मी राक्षसपति वृषपर्व महाराजांची कन्या.

कच—अः तर मग मी आपल्याच सत्तेखालीं आहें ! आपलीच भेट प्रथम झाली यामुळं मी निर्भय झालों.

श०— महाराज, माझ्या सखीकडेच जर आपण पाहुणे आलां असाल, तर आपणच या ठिकाणचे सत्ताधीश आहां असं ह्मणायला कोणची हरकत आहे ! महाराज, माझा पिता इथें नुसतं राज्य मात्र करितो; परंतु सर्व सत्ता ( देवयानीकडे बोट करून ) माझ्या सखीच्या जनकाकडे आहे ! कारण त्याच सद्गुरूंनीं आमचं हें ऐश्वर्य रक्षिलं आहे ! यामुळं मांझ्या सखीची गांठ पडली तेव्हांच आपण निर्भय आणि कृतकृत्य झालां !

कच—( मनांत ) असंच खचित घडो.

देव०— महाराज आपलं चरित्र केव्हां कळेल असं आह्मांला झालं आहे.

कच— बाई, माझं चरित्र एवढं असाधारण नाहीं. तथापि तुमची इच्छा आहे तर ऐका; देवगुरू जे बृहस्पती त्यांच्या इथें मी एवढे दिवस विद्या शिकत होतों त्यांनीं मला पुत्रा प्रमाणं मानलं आहे.

शर्मि०— तर मग आपण ही आमच्या सखी प्रमाणेंच मोठ्या कुळांतले आहां. म्हणूनच आपण एवढे चतुर असून नम्र आहां.

कच— यांत माझी एवढी थोरी ती काय आहे ?

शर्मि०— हेंही खरंच आहे. हे वृक्ष सुद्धां फळयुक्त असून नम्र आहेत. सद्गुणांजवळ नम्रपणा असतोच. महाराज पण त्यांच्या समागमांत आपण एवढे दिवस होतां तो सोडून इकडे येण्यांत आपला कांहीं तरी हेतु असेल.

कच— छे छे सांगण्या सारखा कांहीं एक हेतु नाहीं.

देव०— असं कसं बरं होईल ? मनांत कांहीं हेतु नसतां हा दुःखदायक प्रवास कोण पतकरील ? महाराज सूर्य सुद्धां दिवस, रात्री, आणि ऋतु करण्या करितां प्रवास करितो. ( शर्मिष्ठेला न कळतां वृक्षाची डहाळी धक्का लागल्या सारखं करून हलवून पुष्पं कचा जवळ पडतील असं करिते. )

कच— बाई शुक्रमहामुनीं पासून आपण उत्पन्न झालां आहां तेव्हां चातुर्य आपल्या आंगीं पूर्णपणें वास करीत आहे यांत नवल तें कोणचं ? केवळ विद्या प्राप्ती साठीं महामुनींचं शिष्यत्व करून रहावं एवढ्या साठीं मी इथें आलों आहें.

देव०— महाराज, माझा पिता देवगुरू पेक्षां अधिक विद्या जाणतो कीं काय ? आपला विद्या संपादनाचा हेतु तेथें ही पूर्ण झाला असता.

कच— बाई उभयतांची ही योग्यता जाणण्याचं सामर्थ्य मला नाहीं. बरं, कृपा करून महामुनींची भेट मला करवून द्याल तर आपणच माझं कार्य केलं असं मी समजेन.

देव०— महाराज, आपणा सारख्यांचं एवढंसं कार्य का आमच्या हातून होणार नाहीं ? चला मी आपला कार्यभाग करून देतें. ( शर्मिष्ठेला ) सखे चल; उरलेल्या झाडांचा समाचार आपण संध्याकाळीं घेऊं. ( सर्व चालूं लागतात इतक्यांत स्मरण झाल्या सारखें करून. )

देव०— अगबाई, पण माझ्या आवडत्या कुंदवेलीचा समाचार

घेणं मात्र माझ्यानं लांबणीवर टाकवत नाहीं ( शर्मिष्ठेला ) सखे तूं या पाहुण्यांनां आश्रमांत घेऊन चल. मी अशीच तुझ्या मागोमाग येतें.

शर्मिष्ठा— बरं गडे, तुला अलीकडे मागून एखाद्या गोष्टीची आठवण बरी होते ! पण उशीर लावूं नको. नाहीं तर बाबा मला रागें भरतील ! ( कच आणि शर्मिष्ठा जातात. )

देव०—( कांहीं चालल्यासारखं करून खालीं बसते. ) हें काय बरं असेल ! या पुरुषाला पाहिल्यापासून त्यानं माझं मन हरण करून नेलं ! किंवा मी आजपर्यंत असा सुंदर पुरुष कधीं पाहिला नाहीं म्हणून असं झालं ! पण मी जशी त्याच्या विषयीं एवढी उत्सुक झालें आहें, तसा तो मजविषयीं असेल असं दिसत नाहीं. कारण—

पद—सखये अनुसूये या चा०

नेत्रें जरि त्याला खुण मी केली ॥ तरि त्यानें नच पाहियली ॥
प्रीती दाखविली मनिंची अपुली ॥ त्यानें तसि नच दाखविली ॥
सखिला न कळुनि मी पुष्पें दिधलीं ॥ त्यानें तीं अवमानियलीं ॥१॥

—तर मग यावरून असं म्हणायला कोणची हरकत आहे !

पद—बलसागर तुह्मी या चा०

निष्ठुर फारचि बाइ असे ही पुरुषांची जाती ॥
ठेविति अबला विश्वासावें त्यांवरि त्या पुष्प्रती ॥ धृ० ॥
अबलांचें मन मधुर भाषणें ओढुनि ते घेती ॥
परि सहसा निज कठिण मनाचा ठाव न ते देती ॥
निजकार्यास्तव नम्रपणा किति लटिका दाखविती ॥
होतां परि निजकार्य घातकी निष्ठुर ते होती ॥
जिव्हाग्रीं मधु परि हृदयीं विष कंठ कचें चिरिती ॥
अविवेकी त्यांसम भूवरती अन्य कुणी नसती ॥ १ ॥

—( कांहीं थांबून विचारपूर्वक ) पण एवढ्यांत त्या बिचाऱ्याला मी हा दोष कां द्यावा ! तो आपल्या कार्याच्या चिंतेंत

असल्यामुळं त्याचं मन जाग्यावर कुठें होतं ?

पद—आले वनमाली रात्रीं या चा०

आला तनुवरि होता घर्म बाई त्याच्या किती ॥
म्लानताहि मुखावरी फार तशी आलि होती ॥
बोलताहि मजजवळी चिंतन तो करी चित्तीं ॥
श्रम चिंता युक्त त्याची झालि होती मनोवृत्ती ॥ १ ॥

—अथवा इतक्यांतच मी निराश कां होऊं ? हा पुरुष माझ्या इथें शिष्य होऊन रहाणार आहे, मग आज नाहीं उद्यां मी आपलें मन त्याच्याशीं उघड करीन आणि आपला हेतू साधीन ! ( अंमळ थांबून ) पण मी हें वेड्या सारखं काय मनांत आणित आहें ! माझी मी कां स्वतंत्र आहें ? बाबा सांगतिल तसंच मला वागलं पाहिजे. ( अंमळ विचार करून आनंदानें ) पण बाबा माझ्या मना विरुद्ध कोणचीही गोष्ट कधींच करणार नाहींत ! आणखी ते वडील असून त्यांनीं जर माझं ऐकलं नाहीं तर माझ्या मनावर तर त्यांची सत्ता नाहींना ? फार तर काय यावेळीं माझी सुद्धां माझ्या मनावर सत्ता चालत नाहीं.

पद—त्या मदन मनोरम रूपीं या चा०

वेडें मन उत्सुक झालें उपवनिं या पाहुनि त्यातें ॥
केला मी यत्न न परि तें त्यापासुनि मागें येतें ॥
भूवरि जें फल पडलें तें परतुनि तरुवरि नच जातें ॥
चाल ॥ प्रिय त्याविण मजला कांहीं ॥ अन्य मुळिं नाहीं ॥
ध्यानिं मनिं येतें ॥ तें रम्य रूप मज पुढतें ॥ १ ॥

( इतक्यांत घाईनें सुहास प्रवेश करितो. )

सुहा०— कां बाईसाहेब, इथें एकट्याच बसून गुप्त विचार कसला करितां ? एखाद्याच्या पानावरचा बुंदीचा लाडू गडगडत दूर गेला म्हणजे त्याची जशी स्थिती होते तशीच स्थिति तिकडे गुरूंची झाली आहे !

देव०— बरं एवढं घाबरायला कशाला पाहिजे होतं ? मी कांहीं कुठं रानावनांत वर नवतें. उपवनांतच होतेंना ! आणि तूं तरी पण बाबांनां नाहीं का सांगू ?

सुहा०— पण शर्मिष्ठा बाईसाहेब आपणाला एकटीला टाकून आल्याचं कळलंनां ? मग काय गुरूंचे प्राण खालीं वर होऊं लागले. ते शर्मिष्ठा बाईसाहेबांवर रागावले सुद्धां !

देव०— कायरं, तिच्या बरोबर जे पाहुणे आले आहेत त्यांची आणि बाबांची भेट झाली का ?

सुहा०— छे छे ! ते अगंतुका सारखे बाहेरच उभे होते. मी त्यांनां होमाच्या गडबडींत आंत कसा जाऊं देऊं ?

देव०—आणि ही मेली एकटीच होमापुढें गेली वाटतं ?

सुहा०—अग्नीला नमस्कार करण्याचं निमित्य सांगितलं म्हणून त्यांना तरी मी जाऊं दिल्या. आणखी दुसरं असं; त्यांनां आडकाठी करून एखाद्या असुराच्या लांबलचक पोटांत जावं कुणी ?

देव०—अहाहा ! केवढी मेलीची मिती ! माझे बाबा आहेत म्हणूनच मेलीच्या बापाचे ढोल चालतात ! बरं पण त्या पाहुण्यांनां या, बसा म्हणून तरी नुसतं म्हणायचं होतंस ?

सुहा०—ते उभे होते तेथें आयतेच दर्भ पसरले होते ! झालं जवळच निर्माल्याचं पाणी पडून गार हवाही येत होती आणि निर्माल्याचा सुगंध पण येत होता. मग आणखी मी तो या बसा काय म्हणूं ?

देव०—पुरे ! तूं कांहीं आजचाच आळशी नाहींस ! थांब आपल्या इथें कोणी आले तर तूं त्यांची विचारपूस सुद्धां नीट करीत नाहींस हें मी बाबांना सांगतें !

सुहा०—पण मला त्यांची विचारपूस करायला वेळ कुठें झाला ? गुरू मला तेथें उभेच राहूं देईनात. बागेतून आपण केव्हां योल असं त्यांना झालं. मी मनांत म्हणत होतों कीं गणपती पूजना पुढचं घोटभर दूध पिऊन येईन, पण गुरू मला तेथें थांबूंच देतना !

देव०—बरं. त्या पाहुण्यांना बसायला देऊन पाणीबिणी पाहिजे का ह्मणून विचार जा !

सुद्दा०—( पडद्याकडे पाहून ) पाहिलंत शेवटीं गुरू घाबरलेले इकडे आलेच !

देव०—तर मग जा लवकर त्या पाहुण्यांना पण इकडेच घेऊन ये.

सुद्दा०—( आपल्याशीं ) धन्य आहे ! हे ऋषी ह्मणवितात; पण पोरी साठीं जीव पहा विलविळ तुटतो ! ( पडद्यांत जाते. )

( इतक्यांत शुक्राचार्य प्रवेश करितात. )

शुक्र०—

पद— लाल झालि कोपानें चढवी या चा०

सर्व बंधनां माजि असे अति कठिण बंध या ममतेचा ॥

दारुभेदपटु षडंघ्रि परि त्या भेद न करवे कमलाचा ॥ ध्रु०

मुनि असुनी क्षण मज न सोसवे विरह लाडक्या कन्येचा ॥

जवळी नसतां चिंता करिते भेदचि माझ्या हृदयाचा ॥

एकचि कन्या मज असतां किति भार असे शिरिं चिंतेचा ॥

तर्क न होई बहु असती ज्या कन्यासुत त्यांच्या स्थितिचा ॥ १

( देवयानीं जवळ जाऊन तिच्या तोंडावरून हात फिरवून ) बाळे अशा उन्हाची तूं इथें एकटी कशाला बरं राहिलीस !

देव०— पण तुह्मी होम टाकून माझ्या साठीं एवढे घाबरत इकडे कशाला बरं आलां ? माझ्या एवढ्या मुली बागांत दिवसा एकट्या नाहीं येत वाटतं ?

शुक्र०— बाळे पण अशा उन्हांत तुला इथें मागें राहून काय बरं करायचं होतं ? तूं एकटी आहेस हें ऐकल्यावर मला होम करता सचेल ? कशी तरी एकदांची पूर्णाहुती देऊन इकडे आलों. ( तिच्या तोंडाकडे पाहून ) पहाना सूर्योदय होऊन फार वेळ झाला नाहीं, तरी पण एवढ्याशा उन्हानं तुझी कशी दशा झाली आहे ती !

पद— बायांनो घा सोडोनी या चा०

तीक्ष्ण अशा रवितपनीं या तव गति कशी झाली [illegible] ॥

कमलासम हें मुख तुझें म्लान पहा कितीतरी झालें ॥ श्वास ऊष्ण किती टाकीसी नयनीं जल दुखिया आलें ॥ चाल ॥ झालीस तप्त तापानें ॥ न्हालीस किती घर्मानें ॥ केश पहा भिजले त्यानें ॥ वस्त्रहि तव झालें ओलें ॥ चाल ॥ चालुनियां तपनीं तुझे कोमल पद पोळुनि गेले ॥ १ ॥

( अंगावरच्या शालजोडीनं तिचं तोंड पुसतो. )

देव०— बाबा, हें काय, जरी मी तुमची लाडकी आहें, तरी पुष्प वृक्षांची वास्तपुस्त रोजच्यारोज मला नको का घ्यायला ?

शुक्र०— बाळे, उद्यां पासून हें काम सुहास करील !

देव०— अहाहा ! तो मेला चुकारू ! त्याच्या हातून हें उपवन आठ दिवसांत नाहींसं होईल ! मेला आश्रमांत नेहमी निजलेला असतो हें आपण पहातां तर खरं !

शुक्र०— अथवा, मी तें काम वृषपर्व्यालाच सांगेन. तो मला पुत्राच्याच ठिकाणीं आहे.

देव०— त्या मेल्या असुरांचे हात या निर्मळ झाडांना नकोग बाई लागायला ! पण बाबा, आपल्या इथें एखादा हुषार शिष्य तुम्हीं कां बरं ठेवित नाहीं ?

शुक्र०— ( हांसून ) बाळे, जो मुनी मोठा ज्ञाता, सर्व विद्यांचं परिज्ञान त्याला असतं, त्याच्या इथें शिष्यसमाज जातो. आपल्या इथें येऊन त्यांना प्राप्त काय होणार ? पहा !

पद—नम्र होती फलभारें या चा०

पुष्पयुक्तची या ऋतु माजी तरुवर झाले ॥
म्हणुनि हिंडपटू त्यावरि हे मधुकर आले ॥
गंध जेथें सुमकळिचा नित्य चाले ॥
डुलत राहे फणिगण तो तेथ बाळे ॥ १ ॥

देव०— बाबा, असं कां बरं म्हणतां ? तुमची योग्यता कमी आहे म्हणून तुमच्या जवळ शिष्य नाहींत वाटतं ?

पद—कुसुमसमय संपतां—या ठुंबरीच्या चालीवर

गंध फार चंदनीं असोनी ॥ सन्निध त्याच्या येति न कोणी ॥
त्यावरि बसती भुजंग त्यांची ॥ भीति मानसीं आणोनी ॥ १ ॥

शुक्र०— बाळे, मी हें जाणतों. पण या असुरपतीला अभय देऊन चुकलों. यामुळें आतां माझा इलाज चालत नाहीं.

देव०— तरी सुद्धां, आपण मनांत आणलें तर आपल्या इथें पाहिजे तेवढे शिष्य येतील.

( इतक्यांत पडद्यांत )

[illegible], या ठिकाणीं कन्येसह महामुनी बसले आहेत.

शुक्र०— काय मला भेटण्या करितां कोणी येत आहे वाटतं !

( इतक्यांत पूर्व वेषानं कच येतो )

कच— ज्याप्रमाणं या महामुनींची कीर्ति मी ऐकत होतों, तसेच हे आहेत खरे. म्हणूनच—

साकी.

असुरपजो तो मुनि सामर्थ्यें राज्य करी या भुवनीं ॥
छत्र शिरावरि असतां निर्भय संचरती जन तपनीं ॥
श्रम हरले साचे ॥ होतां दर्शन या मुनिचें ॥ १ ॥

शुक्र०— ( देवयानीला ) वत्से हा सुकुमार असून तेजःपुंज आणि ज्याच्या वाणीवर अमृतानं जसं काय वास्तव्यच केलं आहे, असा हा कोण येत आहे समजलीस का ?

पद—देवस्त्री मेनका या चा०

मानिति आज्ञा सकल देव ते प्रेमानें ज्याची ॥
कीर्ति सकल सुर गाती ज्याच्या तपसामर्थ्याची ॥
पुत्र असे हा त्या सुरगुरुचा मधुवचनें याचीं ॥
[illegible] होतिल मृता जशी कीं धारा अमृताची ॥ १॥

[illegible] ) महाराज, हा देवगुरूचा पुत्र उभयतां-च्या [illegible] आहे.

शुक्र०— तुला ज्याची इच्छा आहे तें मिळो. वत्सा तुझा पिता सर्व देवांसह कुशल आहे कीं ?

कच०—महाराज आपणा प्रमाणं तपोनिधी जगाचं प्रिय करून निरंतर कुशलच असतात.

शुक्र०— बरं, वत्सा तूं इथें कोणचा हेतू धरून आला आहेस ?

कच— महाराज हें मी काय सांगावं ?

दिंडी

माझि आपण [illegible] मानसाचे ॥
त्रिकालज्ञाचि शुचि पुण्यराशि साचे ॥
वस्तु आहे कोणती अशि कराला ॥
दृश्य नच जी होईल भास्कराला ॥ १ ॥

शुक्र०— ( देवयानीस ) वत्से पाहिलंसनां ? मृत प्रेतांनां सुद्धां सजीव करितील अशीं याचीं भाषणं मधुर आहेत.

कच०— ( शुक्राला ) महाराज, पुण्यराशी आपण जें बोलाल तें खरं आहे असं जगाच्या दृष्टोत्पत्तीस आणून देण्याचं सामर्थ्य आपल्या आंगीं आहे.

पद—अर्धे तनू वारुळीं बुडाली या चा०

उग्र तपाचें अतुल बलचि तें ज्यांच्या आंगीं वसे ॥ तयाला कठिण कांहिंही नसे ॥ दिनमणि ऐसा तपतेजानें सुदिव्य तो दिसतसे ॥ पात्रचि विमल यशा होतसे ॥ चाल० ॥ मुनिमाजी आपण तेंवि खरे शोभतां ॥ निज शुद्ध मुखानें जें जें उच्चारितां ॥ तत्क्षणिं तें सारें खरें करुनि दावितां ॥ चाल० ॥ गर्जतांचि घन पर्जन्याची वृष्टी तो करितसे ॥ सत्कृती आपुली तैसी असे ॥१॥

महाराज, आपण मला शिष्य मानून आश्रय दिला म्हणजे ही गोष्ट कांहीं अशक्य नाहीं.

शुक्र०— वत्सा तूं निर्भयपणें देवांचं प्रिय व्हावं म्हणून पित्याच्या आज्ञेनुरूप इथें आलास ! तुला जरी मी आश्रमांत ठेवून घेतला तरी

तूं विचार कर.

पद—वसंतीं बघुनि मेनकेला—या चा०

जनक तव गुरु जो देवांचा ॥ रिपुरक्षक तो द्वेष सकलही असुर करिति त्याचा ॥ ~~पुत्र~~ तूं असती त्या गुरुचा ॥ धरितिल वास्तव असुर हेतु ना मनिं तव घाताचा ॥ रुचेना कवणाही रिपुचा ॥ वास आपुल्या सदनीं मार्गेचि जो निज मरणाचा ॥ १ ॥

कच— महामुने, या गोष्टीची भीती मला मुळींच वाटत नाहीं. कारण,

साकी

रक्षण आपण करितां माझें अप्रिय करावयाला ॥
आश्रमिं अथवा विपिनामाजीं धैर्य नसे असुराला ॥
महदाश्रय असतां ॥ काय करिति मग भय चिंता ॥१ ॥

शुक्र०— वत्सा, तर मी असुरांचा विश्वासघात करावा असंच तूं म्हणतोस ?

देव०— बाबा, यांत हो विश्वासघात कसला आहे ? आतांचना तुम्ही म्हणालां, कीं आपल्या इथें कोणी शिष्य येत नाहीं. आपल्या इथें कोणी विद्या शिकण्या करितां आला, तर त्याला ती शिकविण्यानं विश्वासघात होतो वाटतं ?

शुक्र०— ( हांसून, ) वत्से, खचित या वेळीं आपल्या नांवाला जें योग्य तेंच तूं बोलत आहेस ! तुला आंतल्या गोष्टी ठाऊक नाहींत.

कच०— ( हात जोडून ) महाराज,

पद— नच मातें कोणी स्नेही या चा०

मुनिवंद्या सौख्यागारा ॥ निर्वैरा मलसंहारा ॥ मुनि० ॥
शरण तुम्हांला दिन मी आलों ॥ तारा अथवा मारा ॥ मुनि० ॥
आश्रय तूंची निराश्रिताला ॥ तुजविण अन्य न थारा ॥ मुनि० ॥
भ्रांत अविद्या पंकीं रुतलों ॥ विज्ञामृत मज पारा ॥ मुनि० ॥

शुक्र०— ( विचार करीत स्तब्ध रहातो. )

देव०— ( शुक्राला हलवून ) बाबा प्रत्यक्ष देवगुरूचा पुत्र जर आपला शिष्य होत आहे, तर अजून तो विचार कसला करितां ? कांहीं झालं तरी यांनां आश्रमांत ठेवून घेतलंच पाहिजे !

शुक्र०— बाळे, तूं अज्ञान आहेस, असा हट्ट धरूं नको.

देव०— बरं तर मग मी अज्ञान आपल्या जवळ बसूं तरी कशाला ! ( उठून जाऊं लागते. )

शुक्र०— ( तिचा हात धरून ) बाळे एवढ्या वरून तूं अगदीं निकरावर काय बरं येतेस ? पहा तुला आनंद झाला म्हणजे माझं प्रिय दुसरं काय आहे ? ( कचाला, ) वत्सा तूं यावेळीं मला मोठ्या संकटांत घातलं आहेस. ( अंमळ विचार करून ) कांहीं असो; वत्सा तुला मी या वेळेपासून आपल्या शिष्य वर्गांत गणितों. निरंतर माझ्या आणि विशेषेंकरून ( देवयानीच्या पाठीवर हात ठेवून ) या माझ्या लाडक्या कन्येच्या आज्ञेंत रहा म्हणजे तुझं प्रिय खचित होईल.

कच०— महाराज, माझें प्रिय आतां झालं असंच मी समजतों. ( हात जोडतो. )

देव०— बाबा, पण संभाळा हो ! आतां वृषपर्व्याला राग येऊन तो आपल्याला राज्यांतून घालवून देईल एखादा !

शुक्र०— वत्से, मला तूं लावून बोलतेस पण त्या योगानं, मला राग न येतां उलट आनंदच होतो ! आहाहा ! ज्याला अपत्य नाहीं त्याला या आनंदाचा अनुभव कसा येईल !

कच०— महाराज, आपल्या सदय अंतःकरणानं आणि एक पक्षीं कन्येच्या आग्रहामुळं मी या अनुग्रहाला पात्र झालों !

शुक्र०— वत्सा असंच केवळ नव्हे.

पद— राग कानडा—रजनि नाथ हा नभीं या या०

प्रिय अप्रिय तें आश्रि नेणतों ॥ भूतमात्रिं बा सदय पहातों ॥

अप्पर नाहीं चैतन्याला ॥ सकल ऋतू ते समचि नभाला ॥
धेनु परीही दे व्याघ्राला ॥ समभावानें तोय जलद तो ॥ १ ॥

( पडदा पडतो. )

## अंक २ रा.

### प्रवेश १ ला.

स्थळ:— राक्षस भुवनाजवळचें अरण्य—

( एक राक्षस सशस्त्र रागावलेला प्रवेश करितो. )

राक्षस०— एकूण विश्वासघाता शिवाय कोणाचा नाश होत नाहीं असं जे ह्मणतात, तें अगदीं खरं आहे. गुरूनं शत्रुपक्षा कडील गुरुपुत्र आपल्या आश्रमांत शिष्यत्व करण्या करितां ठेवून घेतला आहे. ( कांहीं थांबून साश्चर्य ) मोठा चमत्कार आहे! अशा तपोनिधीनें सुद्धां असं विश्वासघाताचं वर्तन करावंना! आह्मी सर्वांनीं ज्यावर विश्वास ठेवून ज्याला पुज्य मानिला, त्याच्या हातूनच जर हा अपराध होत आहे, तर आह्माला तरी अशा घातकी पुरुषाशीं कपट करण्याला कोणची हरकत आहे! मला वृषपर्व महाराजांनीं आज्ञा केल्या प्रमाणं आतांच त्या कारट्याला एकटा गांठून त्याचे तुकडे तुकडे करून ते मृगांच्या भक्षस्थानीं पडतील असं करितों; किंवा समुद्रांत फेंकून देतों ह्मणजे त्या योगानं जलवासी मच्छ यांचा तरी आत्मा तुष्ट होईल! ( अमळ इकडे तिकडे फिरून. ) पण हा कारटा मला एकटा कसा सांपडतो! ( कांहीं विचार करून धीर आल्या सारखें करून ) अथवा तो एकटा सांपडणें काय कठीण आहे! ज्या अर्थीं त्यानं गुरुसेवा करण्याचं पत्करलं आहे, त्या अर्थीं दर्भ समिधादि हवन द्रव्यें वनांतून आणणं किंवा गोरक्षण करणं अशीं नीच कृत्यं त्याला करणें भागच आहे. ( इतक्यांत पडद्यांत गाईचे पाय वाजतात. ते ऐकून पडद्याकडे पाहून. ) हो हो! हा समोर गुरूचा धेनुसमूह येत असून त्यांच्या मागून गोरक्षण करीत तो दुष्ट

येत आहे. ( पुनः पडद्याकडे पाहून ) आहवा ! हा कारटा जितका सन्मार दिसतो तितकं अधिक स्फुरण माझ्या बाहूनां येतं ! खचित असल्या रमणीय पोराचं मांस या वनपशूंनीं कधींही चाखलं नसेल ! एकण मी आज त्यानां उंची मेजवानीच करणार आहें. हे मृगानों !

श्लोक—इंद्रवज्रा.

नाहीं पशूंनीं कधिं भक्षियेलें ॥ नाहीं मृगेंद्रासहि जें मिळालें ॥
ऐसें तुह्मांतें नरमांस देतों ॥ भक्षावया मी द्विज कापुनी तो ॥ १ ॥

( पडद्याकडे पाहून ) ठीक आहे तो दुष्ट इकडे येत आहे तर मी एथेंच गुप्तरूपानें रहातों. ( पडद्यांत जातो. )

( इतक्यांत वर्णन केल्या प्रमाणें कच येतो. )

कच०—

पद— हरिणाक्षि ती प्रिया माझी या चा०

विचित्र आहे गति दैवाची ऐसें जें मुनि बोलती ॥
सत्य वाटतें परि तें आतां अनुभव येतां मज चित्तीं ॥
सुरलोकीं मज सकल देव ते प्रीतीनें रक्षित होते ॥
परि येथें मी कालगतीनें रक्षक झालों या पशूंतें ॥
प्रेमानें मज सुरेश घेई सिंहासनिं तो निजहस्तें ॥
तृणयुक्तचि या पाषाणांचें आसन मज येथें मिळतें ॥
वनपशु माझे मित्र निरंतर असती या वनीं संगतीं ॥
सत्य वाटतें परि तें आतां अनुभव येतां मजचित्तीं ॥ १ ॥

( खालीं बसतो. )

—माझ्या या स्थितीचं मला मोठंसं दुःख नाहीं; परंतु माझ्या मनाला विशेष दुःख देणारी गोष्ट निराळीच आहे ! ( कांहीं मनन करून दिर्घ श्वास टाकून ) देवयानी !

पद— मदना चंद्रा या चा०

धरिसी प्रीति कशासि मनीं मजवरी ॥ ध्रु० ॥
निर्दय बहु मी नाहिं दया ती ॥ निष्ठुर मम अंतरीं ॥लेशही ॥ ध० ॥ १
प्रेमानें निज आस कशाला ॥ ठेविसि गे भारी ॥ अदायिया ॥ ध० ॥ २

( अंमळ खिन्न बसून )

शिव ! शिव ! हे कामदेवा ! या स्त्रीला तूं किती अन्यायानं छळीत आहेस !

पद–चाल सदर

मम गुरुतनया असुनि मदर्थचि ॥ योजिसि अपुल्या शरीं ॥ विजला ॥ धरि० ॥ ३ ॥ दुर्बुद्धी तूं धर्मनयाची चाड तुला न खरी ॥ पशुपरी ॥ धरि० ॥ ४ ॥

( शोकाकुल होतो.

गुप्तराक्षस–( आपल्याशीं ) असं काय ! म्हणूनच त्या गुरुकन्येच्या दुःखाचं मूळच नाहींसं करून टाकतों; म्हणजे मलाही एक प्रकारची गुरुसेवाच घडेल ! आतां मी याच्यापुढें कपट वेषानं जातों आणि मरणा पूर्वी जेणें करून याच्या मनाला अतीशय दुःख होईल असा उपाय करितों— ( पडद्यांत जातो. )

कच– खचित देवांनीं आपल्या कार्यासाठीं मला मोठ्या संकटांत घातलं आहे ! हे अधमा कचा ! तूं किती तरी निष्ठुर आहेस !

पद–चाल सदर

सुमन जाइचें दैव बलानें पडतां तुझिया करीं ॥ टाकिसी ॥ धरि० ॥

अथवा मी या भुवनांत कोणाला सुख देण्याकरितां आलोंच नाहीं ! मग हे सुरयानी ! मजपासून तुला तरी सुख कसं मिळावं !

पद–चाल सदर

धरुनि मानसीं कपटचि मी तव जनकाच्या द्वारीं ॥ पातलों ॥ धरि० ॥

या ठिकाणीं मी मानसिक दुःखाची आठवण करून किती जरी दुःख केलं, तरी दया येऊन माझं समाधान कोण करणार आहे !

इतक्यांत ब्राह्मण वेषधारी राक्षस येतो—

ब्राह्मण०– असं कां म्हणतोस ? तुझं दुःख पाहून कळवळणारा या ठिकाणी मी आहें. मुला आंपण येथें क्षणभर उभयतांच्या

सुखदुःखाच्या गोष्टी बोलूं; म्हणजे उभयतांस सुख होईल. मुला, आपण उभयतां समदुःखीच आहों म्हटलं तरी चालेल—

( कचाला ममतेनं आलिंगन देतो. )

कच०—( आश्चर्यानें ) म्हणजे आपण एकटेच इकडे कोणीकडे आलां ? आपण रहाणार कोठले ?

ब्रा०—मुला, तुला मी आपली हकीकत मागून सांगेन. पण प्रथम तुझ्यावर असं कोणतं संकट आलं आहे तें कळूंदे; मुला तूं मजविषयीं मनांत शंका धरूं नकों; मीही तुज प्रमाणेंच दीन आहें !

कच०—एकूण जो संकटांत असतो त्याला संकटांत असणाराच मित्र भेटतो !

ब्राह्म०—पण ते सुद्धां उभयतां सुखदुःखाच्या गोष्टी बोलून कांहीं काल पर्यंत समाधान मानून घेतात.

कच०—महाराज !

दिंडी.

मित्र मिळतां समदुःखि दुःखिताला ॥ परस्परही विसरती स्वदुःखाला ॥
पुनः स्मरणें परि दुःख वयांनां तें ॥ द्विगुण होउनि अतिकष्ट मात्र देतें ॥१॥

ब्राह्मण०—मुला तूं रहाणार एथलाच का ?

कच०—होय महाराज; मी या असुरगुरूचा शिष्य आहें.

ब्राह्म०—बः मग तुला तें संकट कोणचं ?

कच०—महाराज ती गोष्ट फार गुप्त आहे. थोडक्यांत इतकंच सांगतों कीं, मी गुरूच्या आश्रमांत त्यांच्या एकुलत्या एक कन्येच्या दुःखाला कारणी झालों आहें. हेंच मजवरचें संकट.

ब्रा०—एकूण या ठिकाणीं स्त्रिया आणि पुरुष सर्वच दुःखी ! हें आहे तरी काय !

कच—म्हणजे आपण असें कां म्हणतां ?

ब्रा०—मुला नुकतीच एथून जवळच एका विहिरीवर एक मयरूपवती ब्राह्मण कन्या दुःख करितांना मी पाहिली ! ती बिचारी कोणाला उद्देशून पुष्कळ बडबड होती समजत नाहीं !

कच०— ( आपल्याशीं ) काय ब्राह्मणकन्या ! तर मग अन्य स्त्रीची शंकाच नको.

ब्राह्म०— अरेरे ! मुला माझ्या बोलण्या नंतर तुझी वृत्ती अधिकच खिन्न दिसते ! असं कां बरं ? तुझा आणि त्या मुलीचा कांहीं संबंध तर नाहीं ?

कच०— महाराज ती ब्राह्मणकन्याच होती असं आपण कशा वरून ओळखलंत ?

ब्राह्म०— मुला यांत काय कठीण आहे ? नेहमीं गंध उगाळल्यानं तिच्या गोंडस हस्तांना घट्टे पडले होते, तसंच सुमनांच्या ऐवजीं गंधयुक्त कोमल वृक्षपल्लवच तिनं केशांस गुंफले होते. तिची वाणी नम्र असून निष्कपट होती. आणखी दुसरी खूण ती काय सांगूं ! तिच्या सौंदर्या शिवाय अन्य अलंकार तिच्या जवळ नवता !

कच०— महाराज मी सांगतों अशी एखादी खूण तिला होती का ?

साकी—राग—दादरा.

वंदन करितां अग्नीला ज्या तेथ अक्षता पडल्या ॥
ललाट कुंकुम तिलकावरि त्या तीच्या चिकटुनि बसल्या ॥ १ ॥

ब्राह्म०— अरेरे ! तर मग ती तुलाच उद्देशून दुःख करीत होती ! पण तिच्या दुःखाला कारण तूं व्हावंस हें कांहीं जुळत नाहीं !

कच—महाराज म्हणूनच चमत्कार ! मी आश्रमांत राहिल्यानं तिच्या दुःखाला प्रारंभ झाला !

ब्रा०—असं कां बरं? कदाचित तिचं मन तुझ्यावर बसून तर असं होत नसेल ?

कच—असंच दिसतं!

ब्रा०—असा निश्चय तूं कशावरून करितोस ?

कच—तिच्या वर्तनावरून.

पद—माझें हृदय पोळत या चा०

माझें वचन ऐकुनि जाय भुलुनि नाहीं उरत भान तें तिला ॥
प्रिय तिच्या मजवांचुनि कांहीं न ह्याष्टिला ॥ माझें० ॥ धृ० ॥
ती यत्न करी एकांतीं मजसि बोलण्याला ॥
मज सुचवि वसी आश्रमींच नित्य राहण्याला ॥
परि न गणुनि तें गुरुकार्यासाठीं काननाला ॥
मी येता ती धरि मजवरि फार रुष्टवेळा ॥
कळवें यावरुनि हृदय तिचें स्पष्ट मानसाचा ॥ माझें० ॥ १ ॥

आ०—एवढी तुझ्यावर जर ती लुब्ध झाली आहे तर तूं तिच्या इच्छेनुरूप कां वागला नाहींस ?

कच—महाराज हें काय ह्मणतां ?

पद—जन सारे मजला वदतिल कीं या चा०

गुरु कन्या मम ती द्विजराया ॥
केवि वरूनी अभिलाषातें ॥ तुच्छ मानुनी श्रुतिवचनातें
लांच्छन लावूं शुद्ध कुलातें ॥ आचरुनी मी कुपथा या ॥ १ ॥

आह्म०— मुला एवढ्याशा गोष्टीवरून तूं अशी कल्पना कशी करितोस ? अरे एखादी स्त्री वस्तुतः चंचल असल्यामुळं सहज रीतीनं असं करिते. तूं ह्मणतोस या गोष्टीला बळकटी येण्याला ती तुझ्याजवळ स्पष्टपणें तसं कधीं बोलली आहे का ?

कच— महाराज ती प्रत्यक्ष बोलली नाहीं ह्मणून काय झालं ? पहा—

पद—दिसली मुनि कन्या या चा०

मजला निष्कारण कार्यातें ॥ लागुनि ती सन्मुख नेते ॥
लोभें मग मजला ती बघते ॥ भ्रू संकेता दाखविते ॥
करिते मज बघुनी हास्यातें ॥ कुणि बघतां लज्जित होते ॥
जनकाच्या जवळी ती करिते ॥ मम सन्मुख माझ्या स्तुतितें ॥
गणतां नच मी हें सुचवीते ॥ सजल नयनिं निजदुःखातें ॥१॥

आह्म०— मुला एवढ्यावरून तूं तिच्या साठीं दुःख करूं

नकोस.

कच— महाराज आपण ह्मणतां, ती एकाकी विहिरीवर दुःख करीत होती; पण, अलीकडे प्रियां मजवी बिघडल्यापासून तिला निरंवर पल्लवांच्या शीतशय्येवर निजविता; आणि तिच्या सख्या नेहमीं तिच्या जवळ असतात!

ब्राह्मण—मला वाटतं ती याचमुळं त्रासून कोणाला न कळतां तेथें आली असावी!

कच— हेंही खरं असेल. कारण कामिजनांची स्थितीच तशी असते!

ब्राह्म०—मुला आतां तिची गोष्ट बोलण्यांत अर्थच नाहीं.

कच—ह्मणजे? तिनं तेथें कांहीं विपरीत प्रकार तर केला नाहीं?

ब्राह्मण—मुला तें माझ्यानं सांगवत सुद्धां नाहीं. परंतु ती तुझ्या गुरूची कन्या आहे ह्मणूनच सांगतों. ती त्या विहिरीवर हात आकाशाकडे करून उभी राहिली! त्या वेळीं तिची मुद्रा कावरीबावरी झाली होती, आणि एखादी गोष्ट करण्याचा जणु तिचा निश्चय ठरला होता असं तिच्या मुद्रेवरून दिसलं.

कच—अरेरे! महाराज आपण तेथें तिला चार गोष्टी सांगून तिचं अंमळ शांतवन तरी करावयाचं होतं.

ब्राह्मण—मुला मीं तें करण्यास चुकलों नाहीं. पण मी तिला आवरण्याला जवळ जाण्यापूर्वींच तिनं प्राणत्याग केला!

कच—हरहर किति अविचार हा! हा निर्दया कचा! या प्रकारें तूं आपल्या गुरुकन्येच्या परिणामाला कारणी झालास!

पद—विलासिनी ही गेली गेली या चा०

व्यर्थ अदार्यें या प्रेमें धरोनी ॥ व्यसनीं पडलिस तूं सुरयानी ॥ध्रु॥
शोभा होतिस या भुवनाची ॥ कीं जनकाच्या आनंदाची ॥
केवळ खनि तूं होतिस साची ॥ होइल कैसी आतां गुरुची ॥
गति नकळे हें वृत्त ऐकुनी ॥ १ ॥

ब्राह्मण— मुला मी वयोवृद्ध असल्यामुळं तिचं रक्षण माझ्या हातून झालं नाहीं. परंतु तूंही असा वृद्धासारखा शोक कां करितोस ? चल; तिच्या जीविताची कांहीं तजवीज झाली तर पहा.

कच— या ठिकाणीं मला आश्रमांतला एखादा शिष्य भेटता तर बरें होतें. म्हणजे त्याच्या स्वाधीन धा धेनु करून हें वृत्त गुरुला कळविलं असतं. तरी पण आतां कांहीं होतो; वेळ दवडण्यांत अर्थ नाहीं. ( उठतो )

ब्राह्मण०— ( उठून ) मुला चल मजबरोबर. तुला तोच मार्ग दाखवितों !

( उभयतां पडद्यांत जातात. )

—इतक्यांत सुहास काठी घेतलेला इकडे तिकडे पहात येतो—

सुहा०—हा देवगुरुचा पोर आमच्या राशीला शनीच आला आहे हें खरं. याला अंमळ वनांतून येण्याला उशीर झाला, कीं शोधाची कामगिरी माझ्यावर आलीच ! देवयानी ताईसाहेब तर माझ्याशीं अलीकडे धड बोलत सुद्धां नाहींत. यामुळं माझ्या पोटाची मात्र आबाळ झाली ! गुरूंची पण मजवर पहिल्या सारखी मर्जी नाहीं! नवीन पदार्थ ज्याला त्याला प्रिय वाटतोच ! बरं पण आतां याला शोधूं कोठें ? हा एखाद्या असुराच्या पोटांत जाऊन बसला असला तर मलाही तेथें शोधा करितां जावं लागेल कीं काय कोणजाणं ! ( इतक्यांत पडद्याकडे पाहून ) अरे या आमच्या गाई तर इकडे येत आहेत. ( पुनः पडद्याकडे पाहून ) पण कचाची स्वारी कोठें मार्गें दिसत नाहीं ! ( अंमळ विचार करून ) मला तर शंकाच येते !

( इतक्यांत पडद्यांत. )

हा दुष्टा ! आमचा तेजोभंग करण्या करितां तूं एथें आलास काय? आतां पहा एका क्षणांत तुला नाहींसा करितों !

कच— ( पडद्यांत. )

हा तात ! हा सुरपते ! आपल्या पुज्य दर्शनाविरहित मी मंदभाग्य आज मेलों.

श्लोक–शार्दूलविक्रीडित.

ज्यानें अंकिं तुझ्या सदां शिशुपणीं लोळोनि त्वन्मानसा ॥
आनंदासि दिलें, तुझा तनय तो निंद्यस्थलीं या कसा ॥
नीचा हातुनि नष्ट होइ मनिंची राहोनि आशा मनीं ॥
हा मत्तात ! सुरेश ! कोण मजला रक्षील या पासुनी ॥ १ ॥

सुहास– ( उठून ) या ठिकाणीं आमचं शूरत्व काय उपयोगी ? आतां एथून जावं हें बरं. नाहीं तर निवडुंगाच्या फळा सारखे आरक्त नेत्र झालेल्या एखाद्या असुराच्या विस्तीर्ण पोटांत मीही जायचा.

( पुनः पडद्यांत. )

हा नीचा ! आणखी कोणी तुझें रक्षण करण्यास समर्थ असेल तर पहा !

भैरवी

हा सद्गुरो हा करुणाघनारे ॥ हो तूंच आतां मज रक्षितारे ॥

सुहा०– ( भिऊन ) एखाद्याच्या पात्रांत टोपलींतून वाढलेला बुंदीचा मोठासा लाडू जसा पुनः टोपलींत जाणं असंभवनीय असतं, तसंच माझं पुनः आश्रमांत गमन असंभवनीयच दिसतें. ( धांवत पडद्यांत जातो. )

प्रवेश दुसरा.

( श्रांत आणि खिन्न असा सुहास प्रवेश करतो. )

सु०– आतां या आश्रमांत रहाणें नको असं झालं आहे !

कटाव.

भीतीनें चैन पडेना ॥ रात्रंदिन निद्रा येना ॥ असुर नित्य हे ॥
येउनि गुरुच्या ॥ आश्रमिं देती ॥ श्रमासि भारी ॥
दिसति भयंकर ॥ क्रूर व्याघ्रसे ॥ आरक्त नेत्रें ॥ झालीं
ज्यांचीं ॥ रक्त वर्ण तो तनुला आला ॥ हस्ता मध्यें ॥
चमकति त्यांच्या ॥ लखलखीत तीं ॥ शस्त्रें पाहुनि ॥
धाक पडोनी ॥ जाय बुडोनी ॥ चिंता सागरिं ॥ वृत्ती

माझो ॥ गुरु शिष्यांवरि ॥ रोष तयांचा ॥ सुरगुरुचा तो ॥ प्रिय नंदन कच ॥ आनंदानें पशु चाराया ॥ काननिं जातां ॥ त्या नीचांनीं ॥ चरचर चिरुनी ॥ मांस तयाचें ॥ भक्षाया तें ॥ मृगांसि दिधलें ॥ दैवदयेनें ॥ देवयानिच्या ॥ उपजलि मानसिं ॥ प्रीती भारी ॥ हट्ट धरोनी ॥ तिनें पित्याला ॥ भीड घालुनी ॥ संजीवनिच्या ॥ बळें तयाला ॥ सजीव केला ॥ पुनरपि कच तो ॥ वचक धरोनी ॥ काननिं जातां ॥ गुरु कार्यासी ॥ त्या आर्यासी ॥ असुर खलांनीं ॥ काळ साधुनी ॥ पुन्हां चिरोनी ॥ मांस तयाचें ॥ दिलें फेंकुनी ॥ जळधी माजी ॥ जलचर वसती ॥ त्यांसि खावया ॥ असुरां वरती ॥ सुरयानीचा ॥ रोष जाहला ॥ पुनः वियेनें ॥ जनक करानें ॥ सजीव केला ॥ आतां पुनरपि ॥ त्या सुरगुरुच्या ॥ नंदनासि तीं ॥ आनंदानें ॥ काननिं जाया ॥ कधिं नच सांगे ॥ लीला सारी ॥ ही देवांची ॥ कपट पटू ते ॥ असुर मरावें ॥ हटवायावें ॥ असुर गुरूच्या संजीवनिचें ॥ हरण कराया ॥ करिति यत्न हा ॥ गुरुकन्येच्या ॥ मानसिं तो सुर ॥ गुरुचा नंदन ॥ बहु मानवला ॥ नयानयावें ॥ नच पाहोनी ॥ जी सुरयानी ॥ कचा टाकुनी ॥ मजला सांगे ॥ मान देवसे ॥ आश्रम कामें ॥ ऐसे मजला ॥ श्रम बहु होती ॥ प्रतिकुल मज काळचि झाला ॥ भोगितसें या कुदशेला ॥ १ ॥

——आतां होम आटपून गुरुजी शिष्यांना काम सांगण्याच्या गडबडींत असतील. ह्मणून कांहीं वेळ मी कोणाला न दिसे अशा एखाद्या ठिकाणीं बसून मग आश्रमांत जाईन. ( जातो )

( तदनंतर क्रुद्ध झालेला सशस्त्र राक्षस येतो. )

राक्षस—( दांत ओठ चावून ) मूर्खा दोन्ही वेळां केलेला प्रयत्न व्यर्थ गेला, तथापि आज पहा कशी विलक्षण युक्ती काढिली आहे ती !

श्लोक-स्रग्धरा —

माझ्या शस्त्रें पुनः मी करुनि तव तनूचीं तिळप्राय खंडें ॥
घालोनी अग्निमाजी फिरविन वरि त्यां टोंचुनी लोहदंडें ॥
ऐशा योगें करोनी तव मृदु तनु रे दग्ध, रक्षा सुरंत ॥
घालोनी प्राशना ती सविनय गुरुला देउं आर्धी समस्त ॥१॥

— असं केलं ह्मणजे पहावों गुरु तुला कसा सजीव करितो. स्वतःच्या प्राणापेक्षां वर तूं गुरूला अधिक प्रिय नाहींस. ( पडद्याकडे पाहून ) शाबास पुनः माझ्या शस्त्राला आलिंगन देण्या करितां त्वरेनं हा इकडे येत आहे. वर गुप्तपणें मी आपला कार्यभाग साधण्याची संधी पहावों. ( पडद्यांत जावो. )

( इतक्यांत कच प्रवेश करितो— )

कच—या ठिकाणीं आल्या पासून माझ्या चारित्र्याचे जे खेळ झाले, ते मनांत आले ह्मणजे माझें मलाच मोठं आश्चर्य वाटतं.

पद—दिसली पुनरपि या चा०

सुरगुरुसुत मी हरण कराया असुर गुरूच्या विद्येचें ॥
आलों येथें परि ममवचनें द्रवलें मन राक्षसगुरुचें ॥ धृ ॥
वित्त हराया तस्कर येतां सदनीं सन्मन धनिकाचें ॥
कपट वचांनीं त्याच्या भुलतें घडलें तैसें हें साचें ॥
गुरुहुनि ही मजवरि जडलें मन अधिकाचि त्या गुरुकन्येचें ॥
करिल देवता तीच वाटतें सार्थक माझ्या जन्माचें ॥ १ ॥

— अथवा एक गुरुकृपा असल्यावर मग भय कसलें आहे !

दिंडी.

असे आश्रित जो नित्य आश्रयाचा ॥
केंवि करिविल हे घात असूर त्याचा ॥
प्रकाशित जो जाहला प्रकाशानें ॥
काय लोपे तो नीच काजव्यानें ॥ १ ॥

( कांहीं पुष्पें खुडूं लागल्या सारखें करितो. )

( इतक्यांत गुप्त राक्षस प्रवेश करितो. )

राक्षस०— मूर्ख शिरोमणे ! दोन वेळ तुझा घात केला असून, केवळ स्वजाति पक्षपातानंच तुझा हा नष्ट देह या ठिकाणीं पुनः आला ! यांत तुझा पराक्रम तो काय आहे ! असो; तूं एवढीच घमेंडी करितो आहेस. तर तुला एक पलमात्र आमच्या विद्येचें सामर्थ्य दाखवितों. ( असें म्हणून मायावी स्मशान उत्पन्न करून गुप्त होतो. )

कच०— ( पडद्याकडे पाहून भिऊन ) काय, मी गुरूंच्या उपवनांत पुष्पं तोडीत असतां अकस्मात या स्मशानांत कसा आलों ! ( इकडे तिकडे पाहून ) अरेरे ! किती भयंकर तरी हें स्थळ आहे !

पद— आर्द्र नसुनि हा भूमि भाग कां या चा०—

रक्तआर्द्र ही दिसते सारी स्मशान भूमी रुधिरानें ॥
रक्तप वैशा भयद पूतना बसल्या किती या पंक्तीनें ॥
गजबजलें हें स्थान असें कीं भयकर पिशाच्च शब्दानें ॥
मांसगंध किति घेत बसलीं हीं श्वानें एथें आशेनें ॥
॥ चाल० ॥ जीं आंतडीं पडलीं एथ मांस काढुनी ॥ तीं मत्तगृध्र किति
नेति झडप घालुनी ॥ प्रतिकारिति त्यांना श्वानेंही धांवुनी ॥
॥ चाल० ॥ परि नच गणुनी श्वान भीतिला निज सामर्थ्यानें ॥
सबल मत्त हे गृध्र आंतडीं नेतां रडलीं हीं श्वानें ॥ १ ॥

कच०— ( अंमळ थांबून कांहीं पाहून ) अरे हा दुसरा चमत्कार !

पद— लाल शालजोडी जरतारी या चा०

मांस सर्व काढुनियां देती अस्थि एथ ज्या फेंकोनी ॥
विशाल पर्वत त्यांचा बनला त्यावरी बसला येवोनी ॥
वृद्ध पुरुष हा कोण कळेना लोहदंड करिं घेवोनी ॥
भूत पिशाचें रक्तप यातें नमिती कां कर जोडोनी ॥
घालिति कां हे आंतडि त्याच्या कंठा मध्यें बांधोनी ॥

अर्पिति तैसे मांसाचा कां नैवेद्याहि त्या लागोनी ॥
रक्त भरिति कलशामध्यें कां चितांभस्म मिश्रित करुनी ॥
पान करायास्तव विनविति या वृद्धाला सर्वहि मिळुनी ॥ १ ॥

( घाबरून वेड्या सारखा होऊन इकडे तिकडे फिरून खाली बसतो. )

राक्षस०— पाहिलंस मूर्खा कसं सामर्थ्य आहे तें ! ( पडद्याकडे पाहून ) अरे ही देवयानी आपल्या सखीसह इकडे आली. आतां कसं करावं ! मी आधींच याचा घात केला असता तर बरं होतं. तथापि ही येथून जाई पर्यंत याला इथेंच मोहनी मंत्रानं निचेष्टीत करून ठेवितो. गेल्यावर कार्यभाग साधीन. ही या ठिकाणीं असे पर्यंत माझ्या शस्त्राचं कांहीं चालणार नाहीं—

( कचाला निचेष्टीत करून पाडितो. आणि गुप्त होतो. तद्नंतर देवयानी आणि तिची सखी मालती प्रवेश करितात. )

माल०— सखे, साठ वर्षांनीं सुंठ फुलते ह्मणतात तसंच बाई आज किती दिवसांत तूं आनंदांत दिसत आहेस ! बरं, मघाशीं तूं मला कांहीं सुंदर वस्तु दाखविणार होतीस ती कोणती !

देव०— हें काय बाई बळंच माझ्या आंगीं लाववेस? मला नाहीं बाई असं ह्मटल्याची आठवण !—

माल०— खरंच आतांशें तुला आठवण असते तरी कसली ! तूं जरी सांगितलं नाहींस, तरी मी ओळखलं. ( तिच्या गळ्यांत हात घालून )

छंद–द्रुतविलंबित.

असुर जो गुरुला प्रिय गे सये ॥ गुरुसि आज दिली स्वकरें तयें ॥
रुचिर जी तव कंठिं दिसे किती ॥ खचित मौक्तिक माल असेल ती ॥

देव०— सखे ! ही मेली मोत्यांची माळ ! इच्यांत तो दाखविण्या सारखा चमत्कार काय आहे ! मला वाटतं !—

सदाशिव धुंदी या० चा०

सखेगे बाई ॥ सुंदरतेची तुज कशिही चाड मुळिं नाहीं ॥ धृ ॥

बाई मनांतलं सांगण्याला मेला धीरच होईना ! मला दुसरं तें प्रिय काय असणार !

पद—सुखवि नयन किति या चा०

तोचि मनोहर मज लागोनी ॥ प्रियतम त्याविण अन्य न कोणी ॥ धृ ॥
दृष्टि पडुनि जो माझ्या जाई कार्याचि करिंचें करिं राहोनी ॥
रम्य तनूविण ज्याच्या मजला न दिसे कांहीं अशनीं शयनीं ॥ १ ॥

—( कांहीं स्मरल्या सारखें करून ) पण मी त्याला पुष्पं आणण्याच्या निमित्यानं इकडे पाठविला आणि मागोमाग मीही आलें. असं असून तो तर इथें कुठेंच दिसत नाहीं ! तर मग माझ्या मनांतले केव मनांतच राहणार कीं काय ? मेली आश्रमांत सर्वांच्या देखत त्याच्याशीं मना सारखं बोलण्याची चोरी ! म्हणून आज ही संधी आणिली. पण मेलं माझं नशीब पहा कसं विघ्न आणितं तें. ( इकडे तिकडे पाहून ) तो तर इथें कुठेंच दिसत नाहीं ! आतां त्याचा शोध तरी कोणाजवळ करूं ? अथवा या उपवनालाच विचारून बघतें. अरे उपवना,

पद—आम्रमंजरी फुला या० चा०

उत्सुक मी उपवना ॥ झालें ॥ सदया प्रिय दर्शना ॥धृ०॥
निज सुमनांचा गंध देउनी ॥ उपकृति करिसी सूच
निशिंदिनीं पुरवी मम कामना ॥ १ ॥
सांग असे तो कोठें सुंदर ॥ तव पुष्पांहुनि रम्य मनोहर
कच जो प्रिय या मना ॥ २ ॥

( कांहीं चालून एका पुष्पवृक्षाकडे पाहून )

— एवढी स्तुती एखाद्या पाषाणाची केली असती तरी त्याला सुद्धां दया आली असती; मग या उपवनाला कशी बरं येणार नाहीं ? या वृक्षा वरील पुष्पं मला माझ्या प्रियाचा मार्गच दाखवीत आहेत असं यांच्याकडे पाहिल्या वरून वाटतं.

चूर्णचि होतां मौक्तिक त्याची सुंदरता कशि राही ॥ सखे० ॥ १ ॥
नवल हेंचि कीं त्यावरिही तव मना वेडें हें जाइ ॥ सखे० ॥ २ ॥

माल०— नाहीं तर एखाद्या शिष्यानं तुला दिलेली पुष्पांची माळ, अथवा देवांना वाहिलेल्या पुष्पावर बसलेला भ्रमर दाखविणार असशील !

देव०— या दोहोंची मला घटकाभर निंदा केल्या शिवाय रहावतच नाहीं. अरे पुष्पा !

पद—नंद गृहाच्या जवळ मुलींनो या० चा०

सुंदर असुनी गंधाहि देसी आवड तव लोकीं ॥ म्हणुनी ॥ धृ० ॥
अनंग पीडा विरहि जनासी ॥ चाप तयाचें अदया होसी ॥ निष्ठुर
कवि तव पाहुनि ऐसी ॥ निंद्यचि तूं गमसी ॥ मन्मनीं ॥ १ ॥

—तसंच हा मेला भ्रमर किती तरी दुष्ट आहे ! सखे !

पद—अरसिक किति हा शेला या० चा०

मधुपा ऐसा नाहीं ॥ अति निष्ठुर दुसरा अन्य कुणीही ॥
प्राणाहुनि जी अबला ॥ प्रिय यावें मानी लोटुनि तिजला ॥
विरही निशि समयाला ॥ अति कष्ट अदय हा देइ वियेला ॥
सख्याच्या कुदशेला ॥ परि नेणुनि पंकजकोशचि ज्याला ॥
प्रियतम सखये झाला ॥ तो मधुकर तुज कां रुचला बाई ॥ मधु० ॥ १ ॥

( इतक्यांत पडद्यांत— )

आज गुरु महाराजांना वृषपर्व महाराजांच्या मुख्य नाटकशाळेचा गायन समारंभ पहावयास जावयाचं आहे. या साठीं कन्या देवयानी हिनं आश्रमांत रहावं अशी त्यांची आज्ञा आहे.

देव०—( ऐकून ) सखे जा लवकर बाई, मी तुझ्या मागोमाग येतें.

माल०—पण बाबांनीं तूं कोठें आहेस म्हणून विचारलं तर ?

देव०—मग कांहीं तरी शोभेल असं कारण सांग. मी कांहीं एथें फार वेळ बसत नाहीं. ( मालती जाते )

देव०—माझी सखी मला किति प्रकारानं विचारीत होती. पण

दिंडी.

करस्पर्शें किति दिव्य कोश यांचे ॥
दिसति, नाली व्रण रम्य नखाग्रांचे ॥
कांहिं पडलीं तत्करींचीं गळोन ॥
राज्यगत भूपासमचि दैवहीन ॥ १ ॥

—तर हीं जो मार्ग दाखवीत आहेत याच मार्गानें जावें. ( कांहीं चालून पाहिल्या सारखें करून ) हा तर भाई या ठिकाणीं श्रांत होऊन निद्रावश झाला आहे. ( त्याच्या जवळ बसून ) कचा, तुला या भूमीवरच शयन करणें चांगलें वाटलेंना !

भूपती खरे ते वैभव सुख सेवीती या चा०

मी दासी तव तूं धनिच साजसी मजला ॥
ही वाहियली मी काय प्रेमें तुजला ॥
कां प्रेमालिंगन सौख्य देसि भूमीला ॥
तूं नेणसि कैसा निर्मल मत्प्रीतीला ॥ १ ॥

— अथवा तुला तरी कां दोष देऊं. या भूमीचाच हा दोष आहे. अग चांडाळणी !

चाल ॥ भूप तूं सांग किती गे परिणिले ॥
त्यांवरी प्रेम कसें गे दाविलें ॥
बलि किती मृत्यु मुखीं तूं दिले ॥
चाल ॥ जो प्रबल तोचि गे प्रियतम तुजला झाला ॥
अति नीच भुलविसी सांप्रत मत्सखयाला ॥ १ ॥

— ( कांहीं वेळ विचार केल्या सारखें करून ) आतां कसें करावें ! याला जागृत करण्याचें तर धैर्य मला होत नाहीं. मग हें कार्य कोणाकडून बरें करवावें ! ( कांहीं विचार करून कचाच्या हातांत असलेलीं पुष्पें घेऊन ) अथवा या कार्याला यानेंच आपल्या सुंदर हस्तानें तोडलेल्या पुष्पांची योजना करावी. हे पुष्पांनो !

छंद—हरिणी

प्रियचि मतिचा पुष्पांनों या मनोरथ जो असे ॥
मृदु करतल स्पर्शे ज्याच्या तुह्मांप्रति येतसे ॥
परिमळ तथा सांगा माझा निरोप मनोरमा ॥
अधिर बहु ही दासी तूझी असे तव संगमा ॥ १ ॥

( असें ह्मणून त्याला वास येईं अशीं पुष्पं ठेविते )

( इतक्यांत पडद्यांत )

मालती— सखे देवयानी, बाबा येण्याची वेळ झाली, तरी तूं येथें काय करीत आहेस? मी नाहीं बाई एकटी आश्रमांत बसत. मी ही चाललें.

देव०— ( उठून ) ज्या गोष्टी विषयीं अधीर व्हावें त्या गोष्टीला मेलीं विघ्नंच पुष्कळ येतात. ( कांहीं चालून ) ही आणखी कांहीं वेळ आश्रमांत राहिली असती तर मी आपले मनोरथ आज खचित पुरविले असते! आतां पुनः अशी संधी केव्हां येईल ती येवो! ( पडद्याकडे हात करून ) हा आमचा आश्रम कचा शिवाय मला एकटीला असहायकच वाटतो. ( इकडे तिकडे पाहून ) आगबाई, ही गोष्ट वाटतं?

( इतक्यांत पडद्यांत )

पद—लक्ष्मी सम चंचल या था० चा० ( बेहाग )
टाकुं नको मधुपाना खिन्न होउनी ॥
स्वहितावें अहितचि कां मानिसी मनीं ॥ ध्रु ॥
सुख भोगुनि जे उठती ॥ दुःख तेचि अनुभविती ॥
तरु शाखेवरि चढती ॥ काळें बा तेचि पडती ॥
आणुनि हें निज चित्तीं ॥ मधुपाना घे हातीं ॥
रसपानें जाइल तव चित्त रंजुनी ॥ १ ॥

देव०— हा बहुधा या दुष्ट असुरपतीच्या एथला गायनाचा ध्वनि असेल! ( इतक्यांत सुहास घाईनें प्रवेश करितो )

सुहास०— ( टिचकी वाजवून ) बाई साहेब, चला, गुरूंनीं

आपणाला मौज पहाण्याला लवकर बलाविलं आहे! खरंच. असुरपतीच्या नाटकशाळे सारख्या गाणाऱ्या इंद्र कचेरींतील उर्वशी तिलोत्तमा सुद्धां नसतील! गुरुजी सुद्धां आज रंगांत अगदीं गुंग झाले आहेत! हं उठा, मी आश्रम द्वाराला कडी लावून घेतों.

देव०— पुरे. मी कांहीं साफ तिकडे येत नाहीं जा, बाबांना अजून त्या मेल्यांचा कंटाळा कसा येत नाहीं कोण जाणं?

सुहास०— वः नेहमीं श्रीखंडपुरीचं भोजन घालणाऱ्या यजमानाचा कंटाळा कोण करील! हं चलाच लवकर! माझं पोट मी तिकडे ठेवून आपणाला बोलावण्या करितांच धाईनं इकडे आलों!

देव०— बरं, तुला नेहमीं पोटपूजेपुढें दिसतं काय?

सुहा०— ताईसाहेब, कीर्तन आटपल्यावर आज मोठी उंची खिरापत आहे!

देव०—जळो त्या मेल्यांची खिरापत! पण कायरे अजून कच उपवनांतून कां बरं येत नाहीं?

सुहा०—तुमच्या मी पायां पडतों. त्या कचाची गोष्ट राहूंद्या! माझी खिरापत बुडेल! ( इतक्यांत मद्य प्राशन केलेला शुक्र येतो. )

शुक्र—झालं,ही त्या कचाचीच काळजी करीत इथें बसली आहे! बाळे, घटकाभर मौज पहाण्याला येतीस तर!

देव०—बाबा, तुमचा हे मेले दैत्य एवढा अपमान करितात, तरी त्यांचा लोभ कांहीं अजून सुटत नाहीं!

सुहा०— गुरुजी, कीर्तन आटपून खिरापत सुद्धां वांटली वाटतं?

शुक्र—शाबास, ऐन वेळेवर तूं इकडे आलास?

सुहा०— तर मग उपवास असला म्हणजे झिलकीचं प्रयोजन असून व्यर्थ; तीच स्थिति माझी झाली म्हणायची! पण मी अजून पहातों कांहीं साधलं तर!

शुक्र—आतां तरी लवकर जा; वेळ लावूं नको.

( सुहास घाईनें जातो. )

देव०— बाबा, या मेल्या सुहासाची जशी आपण काळजी वाहतां तशी कचाची मात्र वाहत नाहीं !

शुक्र०— झालें पुनः माझ्यावरच दोष देवेस वाटतं ! तुझ्या साठीं दोन वेळ त्याला मी सजीव केला ! आणखी तूंच ना आज त्याला उपवनांत पुष्पं आणण्या करितां पाठविला आहेस ! नाहीं तर त्यालाही तिकडे नेला असता ! बाळे तूं कचावर एवढा लोभ करूं नको ! पहा,

दिंडी

फार ममता दुःखासि मूल होई ॥ म्हणुनि ठेवुं नको प्रेम कचीं बाई ॥
कमलकोशाची प्रीति मधुकराला ॥ निशा काळीं देइ गे यातनांला ॥१॥

देव०— बाबा, तुह्मीं हें सांगतां तरी काय ?

पद—नको हरीनिशिं बाहेरि जाऊं या चा०

अबला मी प्रिय कच मजला बहु दोष कायहो यांत असे ॥ ध्रु० ॥
असुरांची मनिं भीड धरोनी अवगणना ही कां ऐसी ॥
सेवा तत्पर निज शिष्याची करितां बाबा, मी न तसी ॥ १ ॥

शुक्र०— ( आप० ) आतां ही मोठ झाली. हिला उपदेश करण्यांत अर्थ नाहीं ! " भवितव्यता बळवता " ( सखेद श्वास टाकितो. )

देव०— कां बाबा, असे खिन्न कां झालां ! कच पुष्पं आणण्यासाठीं उपवनांत गेला, पण अजून कां येत नाहीं ! त्याचा शोध तरी करा !

शुक्र०— ( तिच्या अंगावर हात टाकून ) बाळे, तुला मी सांगितलं याचा चांगला विचार कर !

देव०—विचार काय करायचा ? तुमच्या मनांत काय आहे तें मी समजलें ! बाबा, तुह्मांला मी एकच सांगतें.

पद—प्रियकर माझे भ्रातें मजवरि या चा०

आणा सत्वरि कच मज साठीं गेला जो उपवनीं ॥

अस्ता गेला दिनमणि तरि कां येइना तो अर्जुनी ॥
किंवा केला आजहि त्याचा घात राक्षसांनीं ॥
येतां नच तो जातिल माझे प्राण खचित निघुनी ॥

शुक्र– ( तिला कुरवाळून ) बाळे तूं अशी भितेस कां ? ( कांहीं विचार करून ) हरहर ! आतां मात्र माझा उपाय नाहीं. बाळे !

पद–चाल सदर.

वांचविदों मी पुनः पुन्हा परि जातां तो काननीं ॥
असुर नष्ट खल एकाकी त्या वधिति संधि साधुनी ॥

देव०–( पडून दुःखानें ) अरे दैवा, असंच जर आज घडलं असेल तर--बाबा, आतां एवढं तरी करा.

चाल—सदर.

ज्या शस्त्रें सुरगुरुचा सुत तो वधिला नीचांनीं ॥
त्या शस्त्रानें मजही टाका स्वकरें तुह्मि चिरुनी ॥ १ ॥

शुक्र–( उभा राहून क्रोधानें ) ह्या मूढानीं या कृत्यानें तुह्मींच आपला घात करून घेतला ! ( मोठ्यानें ) कोण आहेरे तिकडे, या वेळीं वृषपर्व्याच्या उद्यानांत संपूर्ण असुर एकत्र मिळाले आहेत, त्यांना जाऊन माझा असा निरोप कळिव !

पद. झंपा–अधम किति नृपा असासि या चा०

अंध सारे तुह्मी असुर झालां ॥ पातकी नेणतां निज हिताला ॥ धृ० ॥ वध्य न द्विज असें स्पष्ट ती श्रुति रडे ॥ ह्याणुनी परि तुह्मीं लाथ दीला ॥ तो गुरूसुत तुह्मीं जाळुनी पाजिलीं ॥ देहरक्षा सुरेमाजिं मजला ॥ मंत्र जो आजवरी जागतों एक मी ॥ रक्षितों ज्या बळें मी तुह्मांला ॥ योग्य शिक्षा तुह्मां आजि मी देतसें ॥ शिकवुनी मंत्र तो त्या कचाला ॥ अंध ॥ १ ॥

( पडदा पडतो )

आज्ञे प्रमाणें करितों—

शुक्र०— ( खालीं बसून आगावरच्या शालजोडीनें देवयानीचे डोळे पुसून. ) बाळे, आतां तर तुझ्या मना सारखं झालंना ? अरेरे पवढ्याशा गोष्टीमुळं काय दशा करून घेतलीस ही !

पद—निजरूप इला मी या चा०

सरिताचि आश्रुची ही बनली ॥ धृ० ॥
विकसित कच हे झाले लोळुनि ॥
कांति चंद्रिकेसम परि लोपुनि ॥
गेलि मुखाची आश्रु गळोनी ॥
प्रभा नयनिंची ही गेली ॥ सरि० ॥ १ ॥

देव०—( उठून ) बाबा,

पद—झाली ज्याची उपवर या चा०

कच नच पडतां तो दृष्टीला ॥ सौख्य कसें हो होईल मजला ॥ धृ० ॥
शीतपीडिता शांति कशी ये ॥ उष्णकाल जोंवरि नच आला ॥
मृगजलपानें सौख्य कसें तें ॥ व्हावें बाबा, तृषित जनाला ॥
उदय रवीचा नच होतां ती ॥ उघडिल कमलिनि कशि नेत्राला ॥१॥

शुक्र—असंच जर आहे तर आतांच कच कुठें आहे हें तुला कळवितों. ( कांहीं मंत्र जपल्यासारखं करून हात वर करून मोठ्यानें )

साकी—

जलीं, स्थलीं, पाषाणीं, काष्ठीं, मृतीं, सजीवीं, वससी ॥
सांगे कोठें वृत्त कचा तव वेधुनि निज भगिनीसी ॥
वा तव वचनाची ॥ आस दिला थोरचि साची ॥ १ ॥

( पडद्यांतून )

कच— छंद. शार्दूलविक्रीडित

प्राणापानहि पंच योग नियमें जेथें सदा वर्तती ॥
जेथें पंचाहि वायु देति मधुशा कर्पूरगंधामती ॥

येतां जेथ न तेथुनी मवि पुनः बाहेरि जाया वरी ॥
आहे सांप्रत छात्र हा गुरु तुझ्या ऐशा विशुद्धोदरीं ॥ १ ॥

शुक्र– ( देवयानीला. ) वत्से ऐकलंस ? ( कचाला ) वत्सा आतां निरंतर याच ठिकाणीं आनंदानें रहा !

( पडद्यांतून )

कच– आज्ञा गुरो.

शुक्र– ( देवयानीला ) बाळे आणखी तुझी कोणची इच्छा आहे ?

देव०– बाबा माझी इच्छा ती कोणची पूर्ण झाली आहे ?

शुक्र– बाळे,

पद–लग्नाला जातों मी या चा०

मागे जो कोण तुला प्रियचि वाटतो ॥ मी किंवा मत्तनये गुरुकुमार तो ॥ धृ ॥ कुक्षि विदारूनि जरी ॥ कच आला बाहेरी ॥ जातील मत्प्राण तरी ॥ आशा मम तूं न धरीं ॥ चंद्रोदयिं दिनमणिेग अस्त पावतो ॥ मागे ॥ १ ॥

देव०– बाबा, हें काय भलतंच बोलतां !

अंजनीगीत.

प्रकाश आणी रवि हे दोनी ॥ प्रियचि सारखे कमलिनि मानी ॥
उभय मज तुह्मी तेंवि असोनी ॥ अशुभचि कां वदतां ॥ १ ॥

शुक्र– वत्से, तुझी भीड मला मोडतां नये. तर आतां कचाला संजीवनी मंत्राचा उपदेश करितों, ह्मणजे तुझ्या मना सारखं होईल. तथापि मला हें करण्या पूर्वी अग्नी नारायणाला आहुती दिली पाहिजे. ह्मणून चल माझ्या पूजेची सिद्धता कर—( उभयतां उठतात. )

शुक्र. ( दैत्यांना उद्देशून. ) मूर्खांनों यापुढें ही गोष्ट चांगली लक्षांत ठेवा.

पद. तोचे पुरुष दैवाचे या० चा०

॥ केंवि जगीं परयावें ॥ प्राप्ति यशाची होते ॥ धृ० ॥

॥ कुठार छेदी सकल वरूंला ॥ ह्मणुनिच पावे हरिसंगाला ॥
॥ लोहकारकर देइ वयाला ॥ कठार घायातें ॥ १ ॥

( पडदा पडतो )

---

## अंक २ रा.

( झोंपेंतून उठलेला जांभई देत कच प्रवेश करितो. )

कच ( शालजोडीची घडी मोडून ती पांघरून ) गुरुच्या प्रात-र्विधीला आज लवकर प्रारंभ झाला अशी मला शंका होती, पण— ( इकडे तिकडे पाहून ) या वेळीं किती रात्र आहे हें सहज कळून येतें—

पद—किती तरी पहाटची या चा०

पहा किती उद्योगोत्सुक झालें मानस उल्हासें ॥
पूर्वरात्रीं वसन दूरि ॥ टाकियलें शय्येवरि ॥
तनुवरि झाणि तें घ्यावें ॥ मानसिं ये ऐसें ॥ १ ॥
गतयौवन वृद्धेचें ॥ शीर्ष जसें धवल कचें ॥
युक्त असे धवलची ही ॥ रात्रि तसी भासे ॥ २ ॥
दिनमणि करताप भीति ॥ आणुनियां निज चित्तीं ॥
पांथ मार्ग आक्रमिती ॥ त्वरितचि हे कैसे ॥ पहा ॥ ३ ॥

( इतक्यांत सुहास डोळे चोळीत येतो. )

सुहा०—अरे अजून रात्र बरीच असावी असं दिसतं. कारण मला अजून निजावंसं वाटतं आहे !

कच—( त्याच्या जवळ जाऊन ) मित्रा हें तूं काय ह्मणतोस ? अरे, अंमळ सृतीवर येऊन पहाशील आणि ऐकशील तर खरा !

पद—नच ह्यांस पडती ते सज्जन या चा०

अरुणतेज कमलांतुनि पाहुनी ॥ करि उत्सुक होउनी ॥
गुंजारव मधुकर आंतुनी ॥ मित्रा येतो अस्पष्टचि हा

मधुर तयाचा ध्वनी ॥ ऐकतां जाय चित्त रंजुनी ॥
चाल ॥ हे कोकिल तैसे इतर पक्षि बा किती ॥ रव करुनि
जनांला रात्रिमान कळविती ॥ चाल ॥ सारथि रविचा
येउनि बसला पाहे बा आसनीं ॥ सांगतो दिनचर्या
जणु जनीं ॥ १ ॥

सुहास–( डोळे उघडून पाहून ) अरे खरंच अरुणोदय झाला !
मित्रा हा अरुण—एखाद्या पक्‍या भोंपळ्यासारखा लाल दिसतो !

कच०— शाबास ! सुप्रभात सुद्धां खाण्या शिवाय गोष्ट नाहीं.
यावेळीं काय मजेदार सुवास उपवनाच्या बाजूनं येत आहे. ( वास घेतल्या सारखं करून ) अहाहा मित्रा !

दिंडी.

जेंवि येतां संपदा सज्जनाला ॥ नसे उपकारांविण अन्य कार्य त्याला ॥
तेंवि सुमनांचा बहर तरुंस येतां ॥ गंधदानाविण नसे तया चिंता ॥ १ ॥

— मित्रा हा अरुण यावेळीं आकाशाचे रंग क्षणो क्षणीं किती
निराळे करित आहे पाहिलेस का ?

शुद्ध कामदा

पसरलें स्वरें छत्र हें जसें ॥ नभचि त्यावरी रंग देतसे ॥
अरुण होउनी चित्रकार हा ॥ धवल नील कीं रक्त हे पहा ॥ १ ॥

सुहा०— खरंच मित्रा यावेळीं आकाश, एखाद्या पंच पक्वान्नांनीं
भरलेल्या पात्रा सारखं मला दिसतं !

कच–( पड्याकडे हात करून ) मित्रा आणखी पहा नवीन
पिसारा फुटलेला हा मयूर, मयूरीसमोर किती डौलानं नृत्य करीत
आहे तो !

पद–कल्पतरू हे जिकडे तिकडे या चा०

निर्धन होतां मानहानिमय अंतरिं जन आणुनी ॥
गृह दारा जन टाकुनि जातो लज्जित बहु होउनी ॥
सरळ होउनी दैवगती या जरि झाला तो धनी ॥

निज वैभव वरि दारेपवि वो दावि फिरुनि येउनी ॥ १ ॥

सुहा०—( पडद्याकडे पाहून ) काय हा आपल्या आश्रमांत पाळलेलाच मोर! एवढे दिवस हा विरूप झाल्यामुळं लज्जित होऊन कुठें गेला होता. मित्रा परमेश्वर जर याला नेहमी असाच ठेविल तर मजवर त्याचा मोठा अनुग्रह होईल.

कच—अरे असं कां इच्छितोस.

सुहा०—मित्रा तसं झालं म्हणजे हा गुलाम पुनः इकडे यावयाचा नाहीं, आणि सकाळ संध्याकाळ देवयानी बाईसाहेबांची याला खायला घालण्याची कामगिरी आपणावर मग यावयाची नाहीं.

कच—छे! छे! अरे असं निष्ठुर मन कां ठेवावं! पहा या वेळीं हा कसा दिसतो.

पद वरील पद्याचें अर्थ.

चाल ॥ हा मयुर तसा बा सपुच्छ होवो किंवी ॥ नव
वैभवमत्तचि होउनि मार्येप्रती ॥ निजवैभव दावी नृत्य
करुनि मोंवर्वी ॥ चाल ॥ आनंदाश्रू गळवि किंवा हे
याच्या नेत्रांतुनी ॥ मुदित मयूरी ही झाली निजनाथ
असा पाहुनी ॥ १ ॥

सुहा०—बरं मित्रा, यथास्थित भोजन होऊन दक्षिणा मिळाल्या प्रमाणें सांप्रत तूं आहेस. मग आतां एथें राहण्याचें प्रयोजन कोणतें? गुरूची आज्ञा युक्तीनं ग्रहण करून एथून काढशहा काढावा.

कच—ती कोणची बरं?

सुहा०—पहा तूं जिवाला असमाधान असल्याचं मिष कर.

कच—शिव शिव काय सांगतोस हें! अरे ते त्रिकालज्ञ दुसऱ्याचं अंतरंग जाणण्यांत कुशल आहेत, आणि मी आपली घरीं जाण्याची उत्कंठा दाखविली, म्हणजे ते सहज मला जा म्हणतील. अशा सत्पुरुषाशीं मी कपटाचरण करूं काय? अहाहा! मित्रा त्या सद्गुरुचं वर्णन काय करावं!

पद–फुलवांचि कुसुम तें येति मधुप या चा०
जो प्रेमल निर्मळ मलसंहारक साचा ॥
जो उदार सुरतरु अधार निज शिष्याचा ॥
जो ज्ञानागर कीं सागर वा शांतीचा ॥
जो भवसागरतारक हारक विघ्नांचा ॥ १ ॥

( इतक्यांत—पडद्यांत )

" आज कचाला पितृगृहीं जाण्या विषयीं गुरूची अनुज्ञा झाली आहे. तरी सूर्योदया पूर्वी त्यानं निघण्याची तयारी करावी—"

सुहा०— मित्रा दैव अनुकूल असलं ह्मणजे मनासारख्या गोष्टी एका मागून एक घडून येतात. पण आतां जाण्याची तयारी कर जा; वस्त्र पात्र कांहीं फराळाचं वाईसाहेब देतील तें बांधून घेऊं चला! तसाच वाट दाखविण्याला कोणी सोबतीलाही मुला बरोबर घेतला पाहिजे.

कच– छे छे मित्रा, ही सर्व तयारी केलेलीच आहे!

सुहा०— ती रे कशी ?

अभंग—राग देस ताल दादरा

गुरु भक्तीची वा गांठोडी बांधोनी ॥ ठेविलि टांगोनी ॥
मानस सदनीं ॥ विद्यामृत मज गुरूनें जें दीलें ॥
फराळा घेतलें ॥ बरोबरी ॥ सद्गुरू जो मज बोध
करीतील ॥ मार्ग दाखवील ॥ मजला तोची ॥ १ ॥

सुहा०— मित्रा निदान एवढं तरी कर. तुला देवयानी वाई साहेब प्रीतीनं जें गोडगोड फराळाचं देतील तें तूं बरोबर नेणार नसलास तर माझ्या हवालीं कर—

कच०— वः फार चांगली युक्ती!

सुहा०— मित्रा तुझें फराळाचं मीच बांधून ठेवितों; नाहीं तर घाईनं तुला विस्मरण होईल ( जातो )

कच– बरं. तर जा—

( इतक्यांत पडद्यांत )

चला सूर्योदया पूर्वीं त्याची रवानगी झाली ह्मणजे उन्हाचा त्रास होणार नाहीं.

कच—यावेळीं माझ्या मनाची स्थिति किति चमत्कारिक झाली आहे पहा,

दिंडी.

जनक दर्शन होणार आजि मातें ॥
ह्मणुनि मन जों आनंद शिखरिं जातें ॥
तोंचि गुरुपदविरह हा पवन येतो ॥
दुःखसागरिं लोटोनि तया नेतो ॥ १ ॥

( इतक्यांत हवन करून उठलेला शुक्र प्रवेश करतो. )

शुक्र— ( कचाच्या पाठीवर हात थोपटून )वत्सा—

पद अबला ही स्त्री केवल बाला या० चा०

कार्य भाग तव झाला आतां आज्ञा मी तुजला ॥
सुखें देवसें वत्सा जाई झणिं निज सदनाला ॥
शीघ्रविप्राणार्थ जनक तव उत्सुक बहु बा झाला ॥
तृषणेला घन तूंहि तसा जा शमवी तद्विरहाला ॥ १ ॥

—वत्सा यावेळीं तूं स्वर्ग लोकीं पूज्य होशील

पद मम सुत भरत जरी असला या० चा०

॥येतिल सामोरे यानीं ॥ बैसुनि सुर तुज लागोनी ॥
॥निजहित ये जो साधोनी ॥ नमिला नाहीं तो कोणी ॥ १ ॥
॥चाल०॥ तिमिरिं दिनमणी पूज्य तसा तूं होशिल सुरभुवनीं ॥
॥विसरुं नको सुरसत्कारें या दीन गुरु लागुनी ॥ १ ॥

कच— महाराज—

मोठी साकी—अमावि रथ हा निष्प्रतिबंधें या चा०

हविसंगानें अग्निपण जरी येतें जड काष्ठातें ॥
द्विजमुखिंचा परि वेणुपवन नच होमिं मिळवसे त्यातें ॥
बिल्वा परि ही पळशावरती त्रिदल पत्र जरि येतें ॥

म्हणुनि शिव शिरोभूषण नच वें पूजा काली होवें ॥
जरि मी गुरु वेसा ॥ सरि अपुली पावेन कसा ? ॥ १ ॥

आणखी महाराज—

पद—या विरहा का मीसी या चा०

वद सेवेचा कामी ॥ सुरसत्कारोन्मत्तपूज्यपदभ्रांत कसा
होइन मी ॥ गुरुजी ॥ ध्रु०

यहिं जावों परि मानस ठेविन, नित्याचि या तव धामीं ॥ गुरुजी ॥
मधुकर लोलुप झालों मी तव, दिव्याचि या पदपद्मीं ॥ गुरुजी ॥ १

( असें म्हणून चरण धरितो. )

शुक्र०— ( त्याच्या मस्तकावर हात ठेवून. ) वत्सा—

पद—काय कथूं या काली या चा०

उठिं मन्मानसगामी ॥ जाय सुखें धामीं ॥ ध्रु० ॥
सच्छिष्याचि तूं जाणुनि तुजला, दिधली संजीवनि मी ॥ वत्सा ॥
घडुनि हिरा वा साणेवरती सूज्ञ योजिती कामीं ॥ वत्सा ॥ १ ॥

कच— महाराज आतां मागणं एवढंच आहे.

पद—काय वाचिन मीती या चा० ( असावरी )

सप्रेम विलोकीं ॥ विकीं ॥ मुनिवृंदवंदिता, वृंदारक-
गुरुसुत शरणागत मागत हे कीं ॥ ध्रु० ॥
या चरणाचा विसर नसावा ॥ अति पवित्रचि मन्मतिला
ठावा ॥ लव सुरलोकीं ॥ सप्रेम० ॥ १ ॥

शुक्र०— चल. आतां ऊन होण्या पूर्वी वाटेला लाग. ( मोठ्यानं ) कोण आहेरे ? कचाला उदक सीमेपर्यंत वर मी पोंचवीन. पुढें त्याच्या बरोबर सुहासाला जाण्याला सांगा.

( पडद्यांत )

सुहा०— वाटेंत भूक लागलीच वर एखाद्या स्वच्छ झऱ्याचं पाणी पिण्याला आधार काहीं पाहिजे, म्हणून एक नितंबभर पोहे बांधून घेतों. आपण चलावं. ( उभयतां काहीं चालतात )

शुक्र– वत्सा तुझा वियोग या आश्रमांत क्षणभर दुःखाला कारण होतो यांत नवल नाहीं; तथापि तूं कृतकार्य झाल्यानें मला किती आनंद होत आहे ह्मणून सांगूं—

पद–रमाकांत नये या चा०

सत्पात्रीं मंत्रदान करुनि मोद जाहला ॥ पूर्ण यज्ञयाजी
सम मानसीं मला ॥ ध्रु० ॥
नयन असुनि धूम्रभरित ॥ यज्ञ कालिं याजि इरत ॥
निर्भांतचि ला अर्पित ॥ अहुति अग्निला ॥ १ ॥
तिमिरीं कीं क्षुधाक्रांत ॥ क्षुधाशांतिलागिं बसत ॥
निर्भांतचि वदनिं देत ॥ ग्रास तो मुला ॥ २ ॥

कच– महाराज, मी आश्रमांत जाऊन ताईला भेटून येतों.

शुक्र– वत्सा, जा भेटून लवकर ये; तों पर्यंत मी कांहीं अल्प मात्रविधी राहिला आहे तो अटोपून येतों. मुला, आयत्यावेळीं तुला ज्या अवश्य गोष्टी सांगावयाच्या त्या घाईंत कदाचित रहातील, ह्मणून आतांच सांगून ठेवतों. एक—

कच–( हात जोडतो— )

शुक्र—

पद–शापानें तव पति मोहित होती या चा०
दृष्टि निरंतर धर्मी ठेवुनि पाउल टाकावें ॥
धर्मवर्तना निजजनकाही नच सहसा म्यावें ॥
वर्तति जे बा धर्माचरणें ते सख जोडावे ॥
अधर्म मार्गीं आप्त वर्तता त्यांसिही सोडावें ॥ दृ० ॥ १ ॥

हा उपदेश निरंतर ध्यानांत ठेव. ( जातो )

कच– अहाहा ! एकूण लोकांत योग्यता प्राप्त होण्याला आंगांत सामर्थ्यच पाहिजे यांत शंका नाहीं.

दिंडी

वसे अतुलचि सामर्थ्य या मुनींच्या ॥
आणि ह्मणुनी नवलोक चरणिं यांच्या ॥

होति बघुनी भानुची विप्रदोसी ॥
त्रिकालीं त्या मीतिनें अर्घ्य देवी ॥ १ ॥

—एथपर्यंत सर्व गोष्टी ठीक झाल्या. आतां पुढचा कार्यभाग होण्याचा मात्र कठीण आहे. ( कांहीं चालतो. )

( इतक्यांत पडद्यांत. )

छंद—शार्दूल विक्रीडित

नाहीं पावक अन्य तें अधिक वा विश्वासघातापरी ॥
त्याचे भस्मचि हेतु होती मनिंचे जो पाप हें आचरी ॥
विश्वासें फसिं पाडितें कमळ त्या भृंगासि वा मोहुनी ॥
होई मारुचि नास कर्दमिं तया हा न्याय आणी मनीं ॥१॥

कच०— ( ऐकून ) बहुधा आमच्या ताईसाहेबांचेच हे उद्गार असतील ( अंमळ विचार करून ) असो जें होणार तें कोणालाच चुकत नाहीं; मग त्याची काळजी कां ? ( असें म्हणून इकडे तिकडे फिरतो ) काय देवयानीताई तर या ठिकाणीं नाहीं. मग कोठें असेल बरं ! ( कांहीं विचार करून ) बहुधा ती या वेळीं रवीची प्रार्थना पूजा करण्याकरितां अंगणांत बसली असेल, तर तिकडेच जावं— ( कांहीं चालतो— )

( तदनंतर वर्णन केल्याप्रमाणें रवीची पूजा करीत असलेली देवयानी प्रवेश करिते—)

कच—अहाहा ! अशा महामुनी पासून उत्पन्न झालेल्या या देवीच्या मनांत पापवासनेनं आपलं वसतिस्थान कसं केलं कांहीं कळत नाहीं.

साकी—

मुनिकुलजेच्या मानसिं कैसी दुर्बुद्धी संचरली ॥
अमृततरुच्या सुफलीं कैसी विषकटुता ही आली ॥
न कळे मज कांहीं ॥ किंवा विधिची घटना ही ॥ १ ॥

देव०— ( सूर्याला कर जोडून )

शुद्ध—कामदा.

सकळ गोष्टि तूं स्पष्ट पाहसी ॥ मम मनोरथा तोहि जाणसी ॥

पुरवि तो त्वरें इंचि मागतें ॥ शरण मी तुला पाव वंदितें ॥ १ ॥

( नमस्कार करून ध्यान करिते.— )

कच०— ( आपल्याशीं, ) हे सर्वसाक्षी, मीही या वेळीं एक-हेच मागतों—

पद—कैसा जोग बनायावे या चा०

रवि मत्काम हाचि पुरवी ॥ सुबुद्धी भगिनीला भरवी ॥ ध्रु० ॥
काम अधम हा मानसधामीं मलतिमिरातें भरवी ॥
मम भगिनीच्या, दिव्यकरांनीं जगच्चक्षु तो तुरवी ॥ रवि० ॥ १ ॥

—( कांहीं वेळ थांबून आपल्याशीं ) बाईसाहेबांचं ध्यान अजून आटपत नाहीं. तरी पुढें जाऊन आपणच हाक मारावी. ( पुढें होऊन ) बाईसाहेब ! बाईसाहेब !

देव०— ( वर पाहून ) कोण, कचा, ये बैस, आज असा घाईवसा ? का बाबांनीं कांहीं काम सांगितलं आहे ?

कच— होय बाईसाहेब, त्यांचीच आज्ञा झाली आहे.

देव०— त्या नीचांनीं एवढे खेळ केले, तरी अजून सुद्धां बाबा तुला अरण्यांत पाठवीत आहेत ! थांब मी बाबांना जाऊन सांगतें.

कच— छे छे ! बाईसाहेब ऐकून तर घ्या. आज गुरूंची आज्ञा मला घरीं जाण्याविषयीं झाली आहे.

देव०— ( आपल्याशीं ) मना, तुझ्या पुष्कळ दिसांच्या आशेचा निर्णय काय आहे तो आतां ठरेल. मग असं अधीर कां होतेंस? (उघड) बरं मग कचा, तूं आज मला सोडून जाणार तर !

कच— बाईसाहेब,

पद—उभि जवळ खरी ती बाळा

निज सदनीं जरि मी जातों ॥ परि एथें मन ठेवीतों ॥
गुरुसम मी तुज ही बाई प्रियतम गे मनिं लेखीतों ॥
चाल० ॥ सिंधु तो असुरभय हरी ॥ सिंधुलहरी ॥
असासि तूं खरी ॥ मीन मी ठरतों ॥ उभया-
श्रय करुनी वसतों ॥ १ ॥

देव०— ( किंचित लज्जित झाल्यासारखें करून ) कचा, तुला हें करणं शोभतंना ?

कच०— कोणचं बरं ?

देव०—

पद—मलिन वस्त्र परिधान करितसे या चा०

परदारीं येउनि रे कैसा सदार होवोनी ॥ नच तूं ॥
निराधार अधरोत्सुक मजला जाशी टाकोनी ॥
काया वाचा मनें अंगना निजांग वाहोनी ॥ तुजवरी ॥
गुंग जाहली ध्यानिं तुझ्या तिस वदसि कसा भगिनी ॥
मनोरथाचें तुझ्या जियेनें सारथ्यचि करुनी ॥ अजवरी ॥
विजय दिला तुज विला मानिसी जाया कां न मनीं ॥ १ ॥

कच०— बाईसाहेब आपण हें काय म्हणतां ?

पद—सर्वेहि सोड राग नच बरा या चा०

सन्मति अनर्थी तव कां असी ॥ भगिनी रचली ॥
गुरुच्या उदरीं तुजसम मसीं ॥ वासहि असुनी मज-
वरि कसी ॥ दृष्टी धरिली ॥ ध्रु० ॥
वरितां भाउ काय बहिणीसी ॥ नीति उरली ॥
पशुसम करितां या गोष्टिसी ॥ पशुता आली ॥
सज्जन वदतिल या वागिसी ॥ एक्या कालीं ॥
॥ चाल ॥ म्हणुनी विवेक करि मानसी ॥ राखा अपुल्या कुल-
कीर्तिसी ॥ भगिनी हीच आजि बंधुसी ॥ भिक्षा घाली ॥
अन० ॥ १ ॥

( असें म्हणून पदर पसरतो. )

देव०— कचा, हें काय म्हणतोस हें मला मुळींच समजत नाहीं.

कच०— बाई जें धर्म सांगतो, तेंच मी सांगतों.

देव०— कचा—

पद—रव हरिपदकमलकंद या चा० भैरवी

धन्य करी मज्जनमा मान्य हो उदारा ॥ ध्रु० ॥

कामविषयवर्मे धर्म नेणतो विचारा ॥
तद्वचना सार्ठी ही टाकुं नको दारा ॥ धन्य० ॥ १ ॥
विषयनगरिं यौवन वनयुक्त गुणागारा ॥
निर्वेन जो धर्म यासि तेथ नसे थारा ॥ २ ॥
चाल० ॥ यौवन मधु युक्त सुमन ॥ मी, तूं हो मधुप पान ॥
करि मधुचें हाचि मन, धर्म तुझा सारा ॥ धन्य० ॥

कच– ( कांहीं न बोलतां खिन्न उभा राहतो. )

देव०– कचा असं मौन धरून कां उभा राहिलास ?

कच– ताई, तुमच्या बोलण्यावर मी काय उत्तर द्यावं हेंच मला कळत नाहीं.

देव०– ( त्याच्या जवळ जाऊन प्रेमानें ) कचा,

पद–पुष्पपराग सुगंधित या चा०

ने सदनीं अपुल्याहि मला तूं करुनी मजरे निज कामिनी ॥
स्त्री श्रीविरहित जावि गृहीं त्यां मान मिळे नच या जनीं ॥ ध्रु ॥
उत्तम कुळिं तुज जन्म जाहला कुळजाही तव योग्यचि मी ॥
तपन तप्त मी, मेघ होउनी तुष्ट करी जळ सिंचुनी ॥ ने० ॥ १ ॥

कच– ताई, कांहीं विचार करा! विचार करा! ( अंमळ दूर होतो )

देव०– कचा, विचार तो कसला करावयाचा! मी जें करीत आहें, त्याचा पुरता विचार केला आहे. ( असें ह्मणून त्याच्या गळां पडते. )

कच– ( रागानें दूर होऊण ) एकून आतां असं ह्मटल्यावांचून रहावतच नाहीं.

साकी

श्मशानवासी पुष्पित तरुला गंधयुक्त सुमनें तीं ॥
जरि येती तरि विशुद्ध ऐशा गंधा नच तीं देती ॥
तैसी तूं असती ॥ ह्मणुनी अधर्मि नच विटसी ॥ १ ॥

देव०–( दुःखानें ) हाय हाय देवा! या अधम पुरुषजातीवर

विश्वास ठेवल्याचा हा परिणाम !

पद—आजि शेवटचा लाभचि हा या चा०

बहु कपटी हे पुरुष बा जरी असती ॥

कंठ चिराया नच चुकती ॥ धृ० ॥

फणिसम यांची निष्ठुर फारचि जाती ॥

पयपानेंही विष वमती ॥

चाल ॥ आच्छादित तृणदर्भांनीं ॥

जळकूपचि जैसे रानीं ॥ कीं विषतरु युक्त फलांनीं ॥

चाल ॥ हे पुरुष तसे वरिवरि रम्यचि दिसती ॥

कृतिनें परि अंत्यज असती ॥ धृ० ॥

कच—तः एवढ्या गोष्टीवरून जर हा सिद्धांतच आपण ठरविता तर मी जातीलाही धर्मनयाची चाड नाहीं असं म्हणण्याला तरी कोणची हरकत आहे ?

देव०— ( क्रोधानें )

पद—भीमक बाळा म्हणे नृपाळा या चा०

मत्ता मळारे कपटपटो कच करिसि कचासम खरि करणी ॥

नमिळा स्वशिरीं तरि नच चुकशी कंठ चिरायातें अजुनी ॥

उठवा मदर्थ हवासि या मी तावदा ऐसें नच वदवें ॥

तावांचें, तरि तूं उठवासी हवाल कैसा तें वद तें ॥१॥

भुज भीचाला संजीवनिचें दान करावें जनकानें ॥

म्हणुनि बोललें वच न ऐकता अन्य कोणिही जन कानें ॥ २ ॥

हीं मी आणुनि दिनमणि विधि जरि हवदेन्याच्या देहातें ॥

तरि नच घे तो निर्वसनत्वचि प्रियतम त्याच्या देहातें ॥ ३ ॥

तसे धीमता तपस्वतांची जी अति दिव्यचि मत्तातीं ॥

सुरगुणगायनपटु तव जनकीं वसेल कैसी मत्ता ती ॥ ४ ॥

भंग पराच्या आशेचा कधिं करूं नये साधूनीं ॥

जरि करिसी तरि विफल घडो भुज विद्या नेसी साधूनी ॥ ५ ॥

कवम सुतसम कुपुत्र कोणी प्रसवलि नाहीं सवि जननी ॥

नमिला स्वशिरीं वरि नच चुकसी कंठ चिरायावें अजुनी ॥ ६ ॥

कच–( रागानें ) असं काय ? केवळ मी अधर्मानं वर्तन केलं नाहीं त्यामुळं एवढा परिणाम केलास !

छंद–चामर वृत्त

शक्ति जी असे तुला मलाहि तीच ते असे ॥
ज्योवि ऐसि अग्निच्या कणींहि वीजवा वसे ॥
देवकार्यसिद्धि मी करीन मंत्र सांगुनी ॥
मतिपत्यासि तूंहि घे मदीय शाप पापिणी ॥ १ ॥

सवाईच्या चालीवर—मदिरा छंद

शुद्ध गुरूदरिं वास तुझा परि ब्राह्मण पुत्र तुला न वरो ॥
क्षत्रियपुत्रचि या तव नीच अधर्मि करामवि लाभि धरो ॥
वायु सुटोनि वनीं गळतें मृदु कुंदसुपुष्पचि दैववलें ॥
जेंवि रुईवरि तेंवि घडो स्थिति पापिणि तूजहि साबु छलें ॥

( इतक्यांत घाईनं शुक्र प्रवेश करितो. )

शुक्र– हं हं ! वत्सांनो हें काय केलंत ( दोघांस जवळ घेऊन ) पहा !

साकी

दांटे उभयां माजीं बीजचि दिव्य अशा तेजाचें ॥
दहन कराया शक्य असोनी उभयांहि त्रैलोक्याचें ॥
कलहावें करुनी ॥ पडलां व्यर्थचि कां व्यसनीं ॥ १ ॥

कच–( हात जोडून ) महाराज रागाच्या आवेशात माझ्या हातून अयोग्य गोष्ट झाली याबद्दल मी बाईंची क्षमा मागतों.

शुक्र–( देवयानीच्या पाठीवर हात फिरवून ) वत्से तूंही राग सोडून पूर्ववत कचावर प्रेम ठेव. असो, या सर्वच गोष्टी मोठ्या चमत्कारीक घडल्या. एवढ्या वरून असें म्हटल्या शिवाय रहावत नाहीं.

छंद पृथ्वी

प्रभु त्रिजगिं गोष्टि या घडविते निजेच्छाबलें ॥
करो विमल तो मनें अपवित्र जाहलीं जीं मळें ॥

स्वयें घटित दाविलें घडवुनी जना हें तयें ॥
तरेल कवि काव्यि तें कविळ जो भवा निश्चयें ॥ १ ॥

---

*********
* स * मा * प्त. *
*********

## ईशस्तवन.

पद—राग भूप त्रिताल

शिव हरा तारक तूं सुखकारक मार षड्विकारा ॥ धृ० ॥
हा भवसागर थोर सुदुस्तर नाविक तत्पर तूंच खरा ॥
ताता, आतां हो वांचविता या भव पाविता त्वरा करा ॥
हा विटला जननमरणिं या थारा तमोहरा ॥ १ ॥
विषय विषातें प्राशायातें शतशा दुरितें आचरिलीं ॥
दारा धन सुतिं वरिली प्रीती तीच विपत्ती घातकरा ॥
मी नेणियली अविचारें गुण सारा शांतिकरा ॥ २ ॥
पूजा घडुनी तव नेणोनी गेले तरुनी व्याधकुवी ॥
पूजित जो कवि कवनें सुमनें सुमनें तुजला शूलधरा ॥
त्या जनन मरणि नच कारण भस्मधरा गत तिमिरा ॥ ३ ॥